रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ५२
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, ९ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस या वेळी अतिशय खास पद्धतीने साजरा करण्याची तयारी सुरू आहे. वाढदिवसानिमित्त भाजपने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत सेवा पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या कालावधीत देशभरात अनेक समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. याशिवाय पंतप्रधान मोदी त्यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर रोजी स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान सुरू करणार आहेत. याबाबत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत माहिती दिली. या उपक्रमाचा उद्देश हा देशभरातली महिला आणि बालकांचे आरोग्य अधिक मजबूत करणे, त्यांच्यापर्यंत तातडीने आरोग्याच्या विविध सेवा पोहचवणे आणि जागृती निर्माण करणे असल्याचेही नड्डा यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

### अंतरंग

मोरबे धरणालगतची बांधकामे हटवा -मंत्री गणेश नाईक/२
झोपलेल्या मुलींचे चोरून फोटो काढणारा अटकेत/५
यूएस ओपनचा अल्काराझ बादशाह/८

# विरार-अलिबाग कॉरिडॉरचा मार्ग मोकळा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेचा मार्ग मोकळा होताना दिसत आहे. आर्थिक अडचणींमुळे रखडलेल्या या कॉरिडॉरच्या भूसंपादनासाठी २२ हजार २५० कोटी रुपयांचे कर्ज देण्यास हुडकोकडून तत्वतः मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे आता भूसंपादनाला वेग येईल. या प्रकल्पासाठी ७० टक्के भूसंपादन येत्या तीन महिन्यांत पूर्ण करून बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (बीओटी) तत्वावर निविदा काढण्याचेही एमएसआरडीसीने निश्चित केले आहे.

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक कोंडी दूर करत विरार ते अलिबाग प्रवास अतिजलद करण्यासाठी १२८ किमी लांबीचा आणि १६ मार्गिकेचा विरार-अलिबाग मल्टीमॉडेल कॉरिडॉर प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प आधी



मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (एमएमआरडीए) होता, पण २०२०मध्ये हा प्रकल्प एमएसआरडीसीकडे आला. त्यानुसार या मार्गिकेतील नवघर ते बळवली अशा ९८ किमीच्या मार्गिकेसाठी काही महिन्यांपूर्वी निविदा काढण्यात आल्या, तर दुसरीकडे भूसंपादनाचे कामही सुरू होते.

या मार्गिकेसाठी ३३ निविदा सादर झाल्या, पण प्रकल्पाचा खर्च १९ हजार कोटींवरून थेट २६ हजार कोटींच्या वर गेला. तेव्हा इतका निधी उभारणे शक्य नसल्याने अखेर एमएसआरडीसीने ही

### भूसंपादनासाठी २२ हजार कोटींच्या कर्जास तत्वतः मंजुरी

मार्गिका बीओटी तत्वावर राबविण्याचा निर्णय घेत चालू निविदा प्रक्रिया रद्द केली, तर नुकतीच राज्य सरकारने बीओटी तत्वावर या मार्गिकेसाठी निविदा काढण्यासाठी मान्यता दिली तसेच या मार्गिकेच्या भूसंपादनासाठीच्या कर्जहमीसही मान्यता दिली आहे.

एमएसआरडीसीचे दोन्ही प्रस्ताव मान्य झाल्याने अखेर आता हा प्रकल्प मार्गी लावण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारने कर्जहमी दिल्यानंतर एमएसआरडीसीने हुडकोकडे २२ हजार २५० कोटींच्या कर्जासाठी प्रस्ताव पाठवला. त्यानुसार हुडकोने यास तत्वतः मान्यता दिली असून लवकरच २२ हजार २५० कोटी रुपयांचे कर्ज एमएसआरडीसीला मिळणार आहे.

### प्रक्रियेला येणार वेग

या मार्गिकेसाठी १३४७ हेक्टर जागा संपादित करावी लागणार आहे. त्यानुसार याआधीच एमएसआरडीसीने भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केली आहे, मात्र निधीच नसल्याने भूसंपादन थांबले होते. २० टक्केच भूसंपादन झाले होते, पण आता कर्ज मिळणार असल्याने भूसंपादनास वेग दिला जाणार आहे. तीन महिन्यात ७० टक्के भूसंपादन पूर्ण करत मार्गिकेच्या कामासाठी बीओटी तत्वावर निविदा काढण्यात येणार असल्याची माहिती एमएसआरडीसीचे व्यवस्थापक संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.

## उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी आज मतदान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

उपराष्ट्रपतीपदासाठीच्या निवडणुकीसाठी मंगळवारी (दि. ९) मतदान होणार आहे. त्याकरिता तयारी पूर्ण झाली आहे.

या निवडणुकीत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) उमेदवार तथा महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन आणि काँग्रेसच्या अधिपत्याखालील इंडिया आघाडीचे उमेदवार सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांच्यामध्ये लढत आहे. लोकसभेचे ५४२ आणि राज्यसभेचे २३९ सदस्य मिळून ७८१ सदस्य मतदान करतील. विजयासाठी ३९१ मतांची आवश्यकता आहे.

## नेपाळमध्ये सोशल मीडिया बंदीविरोधात तरुणांचे आंदोलन

### १८ जणांचा मृत्यू, अनेक जखमी



**काठमांडू : वृत्तसंस्था**

नेपाळची राजधानी काठमांडूमध्ये सोमवारी (दि. ८) सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील बंदी आणि सरकारी भ्रष्टाचाराच्या विरोधात तरुण आंदोलक (जेन झेड) रस्त्यावर उतरले. या निदर्शनांमध्ये १८ जणांचा मृत्यू झाला असून अनेकजण जखमी झाले आहेत.

निदर्शकांची पोलिसांशी चकमक झाल्याने आंदोलन हिंसक झाले आणि त्यामुळे काठमांडू जिल्हा प्रशासनाने न्यू बानश्वर परिसर व आसपास कर्फ्यू लागू केला, तर संसदेच्या इमारतीत घुसण्याचा प्रयत्न करणाऱ्या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी कारवाई केली. मृतांचा आकडा वाढण्याची भिती आहे.

## विसर्जन मिरवणुकीत मोबाईल, दागिन्यांवर चोरट्यांनी मारला हात

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील सर्वात लोकप्रिय मंडळ अशी ख्याती असलेल्या लालबागचा राजाला निरोप देण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. त्याचाच फायदा घेत भाविकांचे मोबाईल, सोन्याचे दागिने चोरीला गेल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार लालबागचा राजा गणपतीचे दर्शन घेण्यासाठी गिरगाव चौपाटीवर आलेल्या गणेशभक्तांचे १००हून अधिक फोन चोरीला गेले. याबाबत काळाचौकी पोलीस ठाण्यात तक्रारी नोंदवण्यात आल्या. या प्रकरणात अद्याप चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून चार मोबाईल ताब्यात घेण्यात आले आहेत तसेच सोनसाखळी चोरी झाल्याच्याही अनेक तक्रारी पोलिसांत नोंदवल्या गेल्या आहेत. या प्रकरणी पोलिसांनी १२ आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून दोन सोन्याच्या चेन हस्तगत केल्या आहेत. इतर चोरट्यांचा पोलीस शोध घेत आहेत.

## पनवेल पत्रकार विकास मंचचा माझे झाड उपक्रम | आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या वतीने साक्षरता दिनाच्या औचित्याने सोमवारी (दि. ८) वृक्ष संवर्धन साक्षरता दिनाचे आयोजन करण्यात आले होते. इंडियन ऑइल आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमान झालेल्या या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते माझे झाड उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी आमदार विक्रांत पाटीलही उपस्थित होते.

वृक्ष पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्तुत्य उपक्रम हाती घेतल्याबद्दल आयोजकांचे कौतुक करून वृक्ष संवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगितले. आज सुरू केलेल्या अभियानाच्या अनुषंगाने पुढील १० वर्षानंतर रूजलेल्या आणि वाढलेल्या झाडांच्या सानिध्यात आपण सगळ्यांनी पुन्हा एकदा भेटूयात अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांनी पत्रकार विकास मंचला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आमदार विक्रांत पाटील यांनी वृक्ष संवर्धनाचे महत्त्व सांगून उपक्रमाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. पत्रकार विकास मंचचे अध्यक्ष मंदार दोंदे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाच्या नियोजनाची संकल्पना उपस्थितांसमोर मांडली.

या उपक्रमांतर्गत पनवेल महापालिका हद्दीत १०० बहुवार्षिक झाडे लावून त्यांचे संवर्धन करण्यात येणार आहे. पनवेल महापालिका उद्यान विभागाच्या समन्वयाने या वृक्षांचे संवर्धन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते, इंडियन ऑईलचे पश्चिम विभाग एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर पी. त्रिपाठी, जनरल मॅनेजर रत्नशेकर भट्टाचार, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, इंडियन ऑईलचे अभिषेक कुमार, अनिल नागवेकर, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, पमपा उद्यान विभागाच्या वतीने सिद्धार्थ कांबळे आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

## निवडक

### ‘एनआयए’चे २२ ठिकाणी छापे

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) दहशतवादी कट रचल्याप्रकरणी महाराष्ट्रासह देशातील पाच राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश जम्मू आणि काश्मीरमधील एकूण २२ ठिकाणी सोमवारी (दि. ८) छापे टाकले. ही कारवाई एका व्यापक दहशतवादी कटाच्या चौकशीचा भाग असून या छाप्यांमध्ये संशयितांकडून महत्त्वाची माहिती जप्त करण्यात आली आहे.

### चकमकीत दहशतवादी ठार

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या कुलगाममधील गुड्डर भागात सोमवारी (दि. ८) सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. मिळालेल्या माहितीनुसार जवानांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात एक दहशतवादी ठार झाला आहे तसेच ऑफिसरसह तीन जवान जखमी झालेत.

## उरणच्या ओएनजीसी प्रकल्पात भीषण स्फोट

### परिसरातील घरांना हादरे, अनेकांचे नुकसान

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर, बातमीदार**

उरण येथील ओएनजीसी प्रकल्पाच्या गॅस प्रोसेसिंग विभागात सोमवारी (दि. ८) दुपारी ३च्या सुमारास भीषण स्फोट झाला. या स्फोटानंतर तेथे आगीचे लोळ उठले, तर परिसरातील नागावसह आजूबाजूच्या मानवी वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हादरे बसले. त्यामुळे घरांचे नुकसान झाले आहे.

गॅस पाईपलाईन गरम झाल्याने ही दुर्घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. स्फोटाच्या प्रचंड आवाजामुळे दोन ते किमी परिसर दणाणून गेला. काळा धूर व प्रचंड ज्वालांमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. ओएनजीसीचे अग्निशमन दल व संकट व्यवस्थापन पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाल्याने आग



आटोक्यात आणण्यात यश आले.

या दुर्घनेत सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही, मात्र नागरिकांच्या घरांना हादरे बसले. आग आटोक्यात आल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात असल्याचे प्रकल्पतीला अधिकाऱ्यांनी सांगितले, तर आग आणखी भडकण्याची शक्यता लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून प्रकल्पाच्या आजूबाजूचा परिसर तातडीने रिकामा करण्यात आला. सुरक्षेच्या दृष्टीने गॅसपुरवठा तात्पुरता बंद ठेवण्यात आला असून परिस्थिती स्थिर राखण्यासाठी कंपनी प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत.

परिसरातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन ओएनजीसीच्या अधिकाऱ्यांनी केले आहे. दरम्यान, सायंकाळपर्यंत येथील आग विझाविण्याचे काम सुरू, होते, अशी माहिती उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी दिली.

## मंत्री आदिती तटकरे आणि भरत गोगावले एका व्यासपीठावर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडच्या पालकमंत्रिपदाचे दावेदार असलेले राज्याचे रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले आणि महिला बालविकासमंत्री आदिती तटकरे सोमवारी (दि. ८) अलिबागमध्ये व्यासपीठावर एकत्र आले. दोघे एकमेकांच्या शेजारी बसून गप्पा मारत होते. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या.

मुख्यमंत्री समृद्ध राज अभियान प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ अलिबागच्या आरसीएफ वसाहतीमधील सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी दोन्ही मंत्रीमहोदय प्रमुख अतिथी होते. व्यासपीठावर जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक



आंचल दलाल हेही उपस्थित होते.

पालकमंत्रिपदाबाबत दोन्ही पक्षांचे नेते एकत्र बसून निर्णय घेतील. आम्ही दोघे रायगडच्या विकासासाठी एकत्र राहू, असे मंत्री आदिती तटकरे यांनी या वेळी सांगितले, तर आम्ही दोघे चांगल्या कामासाठी एकत्र आलो आहोत. यात कुणी राजकारण आणू नये. जिल्ह्यासाठी आम्ही दोन मंत्री आहोत. आमच्यातील कुणी पालकमंत्री नसला, तरी आम्ही जिल्ह्यासाठी काम करू, असे मंत्री भरत गोगावले म्हणाले.


## पनवेलमध्ये घडणार लालबागच्या राजाचे दर्शन

### महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेचा गौरा गणेशोत्सव

**पनवेल : वार्ताहर**

ज्याच्या दर्शनासाठी लाखो भक्तांचा जनसागर मुंबईत लोटतो त्या लालबागच्या राजाचे दर्शन पनवेलकरांना होणार आहे. पनवेलमधील महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेच्या गौरा गणेशोत्सवात लालबागच्या राजाची प्रतिकृती १० सप्टेंबरला पनवेलमध्ये विराजमान होणार आहे. या उत्सवाचे यंदा ३३वे वर्ष आहे.

महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटना व फळभाजी विक्रेते सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या ३२ वर्षांपासून गौरा गणेशोत्सव साजरा केला जात आहे. संघटनेचे जवळपास तीन हजारांपेक्षा जास्त सभासद असून यामध्ये छोटे मोठे व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करणाऱ्यांचा समावेश मोठ्या संख्येने आहे.



या उत्सवामागची संकल्पना स्पष्ट करताना महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेचे अध्यक्ष एस.के. नाईक यांनी सांगितले की, गणेशोत्सव साजरा होत असताना भाविकांना गणरायासाठी आवश्यक असणारे साहित्य विक्री करण्यात येथील व्यावसायिक गुंतलेले असतात. त्यामुळे त्यांना त्या वेळी गणेशोत्सवाचा आनंद घेता येत नाही. म्हणूनच संघटनेने ३२ वर्षांपूर्वी गौरा गणेश उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली.

आधी वेगवेगळ्या मूर्तींची येथे प्रतिष्ठापना केली जात होती, परंतु गेल्या २६ वर्षांपासून लालबागच्या राजाची प्रतिकृती पनवेलमध्येच तयार करून तिची स्थापना केली जाते. या बाप्पाला भाजी मार्केटचा राजा म्हणून संबोधले जाते. ही मूर्ती साकारणारे संतोष रत्नाकर कांबळी व त्यांचे सहकारी रात्रंदिवस कार्यरत आहेत तसेच राजाचे धोतर सजवण्याचे काम रूपेश पवार करीत आहेत, असे संघटनेच्या उत्सव समितीचे अध्यक्ष प्रल्हाद नाईक यांनी सांगितले.

गौरा गणपती उत्सव सर्व धर्मीय लोक जात, पात, वंश, भेद असे सारे विसरून एकदिलाने साजरा केला जातो. महाप्रसादाचेही आयोजन करण्यात येते. मनोभावे पूजा, अर्चा व सेवा करून दीड दिवसानंतर मोठ्या दिमाखात राजाचे विर्सजन केले जाते. अशा या बाप्पाच्या स्वागताची सध्या जय्यत तयारी सुरू आहे.

## रायगडात वार्षिक पर्जन्यमानाच्या ७३ टक्के पाऊस

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सोमवारपर्यंत (दि. ८) वार्षिक सरासरीच्या ७३.७ टक्के पाऊस पडला आहे. आतपर्यंत पडलेला पाऊस समाधनकारक असून शेतीला पूरक आहे. विशेष म्हणजे धरणक्षेत्रात चांगला पाऊस पडल्याने लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील २५ लघुप्रकल्प १०० टक्के भरले आहेत. जिल्ह्यातील धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे.

रायगड जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान तीन हजार १४८.६ मिलीमीटर आहे. जिल्ह्यात ८ सप्टेंबरपर्यंत २३२०.७ मिमी पावसाची नोंद झाली. वार्षिक सरासरीच्या ७३.७ टक्के पाऊस पडला आहे. जून महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला, परंतु जुलै व ऑगस्ट महिन्यात पाऊस कमी पडला. जून महिन्यामध्ये जिल्ह्यात सरासरी ६५५.८० मिमी पाऊस पडतो. यंदा मात्र ६९६ मिमी पावसाची नोंद झाली. जून महिन्यात सरासरीच्या १०६ टक्के पाऊस पडला. जुलै महिन्यात जिल्ह्यात साधारणपणे १२०६.२ मिमी पाऊस पडतो. यंदा जुलै महिन्यात ७६३.६ मिमी पाऊस पडला. (पान २ वर..)

राम प्रहर
दिवाळी २०२५
मुक्तछंद
मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.
चला तर लागूया कामाला...
ramprahar@gmail.com

# मोरबे धरणालगतची बांधकामे हटवा

## मंत्री गणेश नाईक यांची सूचना | जलपूजन कार्यक्रमात अधिकाऱ्यांना धरले धारेवर

**चौक : प्रतिनिधी, नवी मुंबई : बातमीदार**

मोरबे धरणाच्या काठावरील घरे, बंगले यांना मोबदला देऊन ते जमीनदोस्त करा, जेणे करून या वास्तूंचे सांडपाणी धरणात येणार नाही, पाणी दूषित होणार नाही याची दक्षता मोरबे धरण प्रशासनाने घ्यावी, असे परखड मत वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केले.



नवी मुंबई महानगर पालिका यांना पाणी पुरवठा करणारे मोरबे धरणाचे जलपूजन सोमवारी (दि.८) मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. नवी मुंबई शहरातील नागरी सुविधांसाठी आरक्षित असणारे भूखंड सिडकोने विकले आहेत. या भूखंडांना सीसी देण्याचे काम पालिकेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांनी केले आहे, असा गंभीर आरोप करत वनमंत्री नाईक यांनी सिडको आणि पालिकेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. शहराच्या नियोजन आणि विकासात काही अधिकाऱ्यांकडून खोडा घालण्यात येत आहे. हा सारा प्रकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्या निदर्शनास आणू, असा भ्रष्ट अधिकाऱ्यांची शहरातून हकालपट्टी करून, असा इशाराही वनमंत्री गणेश नाईक यांनी या वेळी दिला.

जलपूजन कार्यक्रमाला प्रथम महापौर व माजी खासदार संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक व नवी मुंबई महानगर पालिका आयुक्त कैलास शिंदे उपस्थित होते. या वेळी आयुक्त कैलास शिंदे व माजी खासदार संजीव नाईक यांच्या हस्ते पूजा करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठे, नवी मुंबई महानगर पालिका यांची हद्द व पनवेल महानगर पालिका यांच्या खारघर व कामोठे विभागाला पाणी पुरवठा करणारे मोरबे धरण हे नवी मुंबई महानगर पालिका यांच्या मालकीचे आहे. दरवर्षी धरण पूर्ण क्षमतेने भरले की नवी मुंबई महापालिका पाणीपुरवठा विभाग यांच्या वतीने जल पूजन करण्यात येते. यावर्षी २० ऑगस्ट २०२५ रोजी मोरबे धरण पूर्ण क्षमतेने भरले. गेल्या वर्षी २९ ऑगस्ट रोजी जल पूजन करण्यात आले होते. नवी मुंबई महानगर पालिका हद्दीतील सर्व जनतेस स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठा होणे क्रमप्राप्त आहे, यासाठी नवी मुंबईकर यांच्या आरोग्याशी खेळ नको, त्यामुळे पूर्ण धरणाला कुंपण घालण्यात यावे, धरणाच्या काठावरील घरे बंगले व अनधिकृत बांधकाम काढून टाकण्यात यावे असे स्पष्ट निर्देश दिले, हे झाले नाही तर मी स्वतः तक्रार करीन असे सांगून अधिकारी व प्रशासनाने प्रामाणिक कर्तव्य बजावून जनतेला स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठा करावा, असेही मंत्री गणेश नाईक यांनी आवाहन केले.

या वेळी पाणीपुरवठा विभागात चांगले काम केले त्यांचा सत्कार मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी माजी नगरसेवक जयाजी नाथ, रविंद्र इथापे, सौ.शिर्के, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, अतिरिक्त आयुक्त गेठे,शहर अभियंता शिरीष आदरवाद, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता मोरबे वसंत पडघम, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा शंकर जाधव, जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, सरपंच सुहास कदम, माजी सरपंच सचिन मते, राहुल मोरे यांच्यासह नवी मुंबई महानगर पालिका माजी नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी, मोरबे धरण कर्मचारी उपस्थित होते.

# नोकरी मागणारे नव्हे; तर नोकरी देणारे व्हा -आमदार प्रवीण दरेकर

## महाडमध्ये मध्य कोकण क्षत्रिय मराठा क्रेडिट सोसायटी शाखेचे उद्घाटन



**महाड : प्रतिनिधी**

मध्य कोकण क्षत्रिय मराठा को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या महाड शाखेच्या भव्य उद्घाटन सोहळ्यात मुंबई बँकेचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र सहकार संस्थेचे प्रमुख आमदार प्रवीण दरेकर यांनी आपल्या भाषणात तरुणांना मार्गदर्शन करताना सत्तेचा उपयोग सर्वसामान्य जनतेसाठी व्हावा. कोकणातील तरुणांनी शिक्षणानंतर मुंबई – पुण्याकडे धाव घेण्याऐवजी आपल्या मातीत राहून उद्योग उभे करावेत, रोजगार निर्माण करावा. नोकरी मागणारे नव्हे तर नोकरी देणारे व्हा, असा सल्ला त्यांनी दिला. त्यांनी कोकणात डेअरी, मच्छीमारी आणि फळ प्रक्रिया केंद्र उभारण्याची गरज अधोरेखित केली. तसेच सहकार क्षेत्राच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला.

फलोत्पादन व रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले म्हणाले की, कोकणातील शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि त्यांना शेतीसोबत जोडधंद्याची संधी उपलब्ध व्हावी यासाठी फळ प्रक्रिया केंद्र उभारले जाणार असून नवरात्राच्या काळात तातडीची बैठक घेण्यात येईल, अशी घोषणा केली.

हिरवळ प्रतिष्ठानचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी दोन महिन्यांत कोकण मेळावा आयोजित करून सहकार क्षेत्रातील दिग्गज नेतृत्व म्हणून आमदार प्रवीण दरेकर यांचा जाहीर सत्कार केला जाणार असल्याची घोषणा केली. हजार कोटींपासून १६ हजार कोटींचा टप्पा मुंबई बँकेने गाठला असून त्याचे सर्व श्रेय प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वाला जाते, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

सन १९३६ मध्ये स्थापन झालेल्या मध्य कोकण क्षेत्रीय मराठा को – ऑप ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची महाड शाखा प्रभात कॉलनीत मान्यवरांच्या उपस्थितीत सुरू झाली. उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी तब्बल एक कोटी रुपयांहून अधिक ठेवी जमा झाल्या. अध्यक्ष राजेश येरुणकर यांनी संस्थेच्या ९० वर्षांच्या कार्याचा आढावा मांडला आणि भविष्यात आणखी शाखा उघडण्याचे संकेत दिले.

सोहळ्याला मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, संचालक प्रकाश दरेकर, डॉ. यश प्रवीण दरेकर, डॉ. चेतन सुर्वे, अमित मोरे, नितिन पावले, उपजिल्हाधिकारी चंद्रसेन पवार, रविंद्र तरडे, ज्ञानदीप पतसंस्थेचे अध्यक्ष जिजाबा पवार, प्रमोद घोसाळकर, प्रशांत यादव, राजेश येरुणकर, बिपीन महामुणकर आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे लोकायुक्त अभियान –मंत्री तटकरे

**रायगड : रामप्रहर वृत्त**

ग्रामविकास मंत्रालयाकडून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे लोकायुक्त अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान राबविण्यात येणार आहे. गावांचा विकास होण्याच्या दृष्टीने हे एक सकारात्मक पाऊल आहे. या अभियानात सर्व ग्रामस्थांनी मिळून एकत्रित काम केल्यास गावांचा विकास शक्य असल्याचे मत महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले. रायगड जिल्हा परिषद अंतर्गत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान जिल्हास्तरीय कार्यशाळा कुरुळ येथील आरसीएफ सभागृहात पार पडली. या वेळी त्या बोलत होत्या.

यावेळी रोहयो मंत्री भरत गोगावले, यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, सामान्य प्रशासन विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे, प्राथमिक शिक्षण अधिकारी ललिता दहीतुले, माध्यमिक शिक्षण अधिकारी महारुद्र नाळे, आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे यांच्यासह जिल्हा परिषद खातेप्रमुख, गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच उपस्थित होते.



मंत्री तटकरे म्हणाल्या की, ग्रामपंचायत म्हणजे राज्य व केंद्र सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्याचे सर्वोत्तम साधन आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सात घटकांवर आधारित आहे. सर्व ग्रामस्थांनी मिळून एकत्रित काम केल्यास गावांचा विकास शक्य आहे. गाव अधिकाधिक स्वच्छ ठेवण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करावेत तसेच जलसमृद्ध गाव करणे हा प्रमुख दृष्टिकोन असावा, असे आवाहनही मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

गावांचा शाश्वत व सर्वांगीण विकास करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत योजना जनतेच्या दारी पोहचतील. गाव सक्षम असेल तर जिल्हा सक्षम होईल, जिल्हा सक्षम झाला तर राज्य आणि राज्य सक्षम झाले ते देश सक्षम होईल. सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा, हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करू, असे आश्वासन रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी केले.

या अभियानंतर्गत सात घटकांवर काम करायच आहे. लोकाभिमुख प्रशासन तयार करायचे आहे. जिल्ह्यातील ५०७ ग्रामपंचायतींच्या नावे सेतू केंद्र असून, जनतेला आवश्यक असलेले दाखले ग्रामपंचायत मधून मिळत आहेत. प्रत्येक ग्रामपंचायत हद्दीत किमान एक हेक्टर जागेवर बांबू लागवड करण्यात येत आहे. यामधून ग्रामपंचायतींना आर्थिक उत्पन्न मिळेल. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

ग्राम समृद्ध करण्यासाठी अभियानांतर्गत सर्वांनी प्रयत्न करावेत. अभियानांतर्गत ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद यामध्ये एक स्पर्धा आहे. अभियानामुळे योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात येईल. सर्वांना हे अभियान आपले वाटावे असे काम करून अभियानात जनतेचा सहभाग मिळवावा, असे मार्गदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान उत्तमप्रकारे कसे राबविण्यात यावे याबाबत यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांना मार्गदर्शन केले. अनेक सरपंच व अधिकारी यांच्यासोबत चर्चा केल्यानंतर हे अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती मल्लिनाथ कलशेट्टी स्पष्ट केले.

# आमदार रविशेठ पाटील यांचा नागोठण्यात गणेशोत्सव मंडळांकडून सन्मान

**नागोठणे : बातमीदार**

आमदार रविशेठ पाटील यांनी नागोठणे येथील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेटी देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले.



आमदार रविशेठ पाटील यांनी सर्वप्रथम शिव गणेश उत्सव मंडळ, बाजारपेठ नागोठणे येथे श्री गणरायाचे दर्शन घेतले तसेच सत्यनारायण महाप्रसादाचा लाभ घेतला. या वेळी मंडळाच्या वतीने मंडळाचे मार्गदर्शक किशोर जैन, नरेंद्र जैन, प्रका जैन, अनिल काळे, अध्यक्ष अंकुश जैन, उपाध्यक्ष सचिन मोदी, अतुल काळे, गौतम जैन, प्रथमेश काळे, संतोष जैन व इतर मान्यवरांनी आमदार पाटील यांचे स्वागत व सन्मान केला. स्थानिक व्यापाऱ्यांनी आमदार साहेबांचे विशेष आभार मानले. कारण नागोठण्यातील आम सभेनंतर नागोठण्यातील विजेच्या प्रश्नात सुधारणा झाली असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच या संदर्भात स्वतंत्र बैठक आयोजित करण्याची विनंती भाजप शहराध्यक्ष सचिन मोदी यांनी आमदार रविशेठ पाटील केली.

यानंतर आमदार रविशेठ पाटील यांनी नागोठणे पोलीस स्टेशन येथील गणरायाचे दर्शन घेतले. पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी आमदार रविशेठ पाटील यांचे स्वागत करून सन्मान केला.

यानंतर आमदार पाटील यांनी प्रभू आळी येथील शंकर मंदिर परिसरातील श्री सन्मित्र मित्र मंडळ, तसेच सरखेल कान्होजी आंग्रे अंगरआळी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ येथे दर्शन घेऊन उपस्थितांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. भेटीच्या शेवटी आमदार रवीशेठ पाटील यांनी के.एम.जी. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ येथे गणरायाचे दर्शन घेतले.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे काम मार्गी

**अलिबाग : प्रतिनिधी**

राजकीय मतभेद, स्थानिकांचा विरोध आणि इतर तांत्रिक कारणामुळे रखडलेले अलिबाग तालुक्यातील उसर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे काम आता मार्गी लागले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे काम आता सुरू झाले आहे.



महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्य विभागाने २०१२ साली अलिबाग येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मंजूरी दिली होती, मात्र त्यानंतर नऊ वर्ष हा प्रस्ताव लालफीतीत अडकला होता. २०२१ साली भारतीय आयुर्विद्यान परिषदेनी या वैद्यकीय महाविद्याल सुरू करण्यास मान्यता दिली होती. २०२२ पासून अलिबाग येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले. महाविद्यालयासाठी उसर येथील ५३ एकर जागा महाविद्यालयासाठी उपलब्ध करून देण्यात आली. फेब्रुवारी २०२२ मध्ये महाविद्यालयाच्या कामाचे भुमिपूजन पार पडले होते, मात्र तीन वर्ष प्रत्यक्ष कामाला गती मिळू शकलेली नाव्हती.

महाविद्यालय प्रशासकीय इमारत आणि पाचशे खाटांच्या रुग्णालयाकरता साडे चारशे कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. पहिल्या टप्प्यातील निधी उपलब्धही झाला. निवीदा प्रक्रीया होऊन ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली, पण काम मात्र सुरू होऊ शकलेले नाही. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या भुमिपूजनावेळी शिवसेना आमदारांना निमंत्रण न दिल्याने राजकीय वाद उफाळून आला. यानंतर कधी स्थानिकांचा विरोध, तर तांत्रिक कारणामुळे इमारतीचे काम रखडत गेले. सुरवातीला ईपीआयएल कंपनीला या कामाचा ठेका देण्यात आला होता, मात्र नंतर हा ठेका रद्द करून रॅक इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीकडे हे काम सोपवले गेले. आता तीन वर्षांच्या प्रतिक्षेनंतर महाविद्यालयाच्या प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाली आहे.

इमारातीचे काम रखडल्याने सध्या वैद्यकिय महाविद्यालयाचा कारभार भाड्याच्या जागेत सुरू आहे. वैद्यकीय महाविद्यालयासाठी अलिबाग येथील जिल्हा रुग्णालय तीन वर्षासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाने संलग्न केले. तर आरसीएफ कॉलनीतील काही इमारती, शाळेची इमारत आणि चार एकर जागा भाड्याने घेण्यात आल्या आहेत. तीन वर्षांचा भाडेकरार संपुष्ठात आला हा करार नुतनीकरणाची प्रक्रीया पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

पान १ वरुन

## पनवेल पत्रकार विकास मंचचा माझे झाड उपक्रम

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार मंचचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, विवेक पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार संजय कदम, सरचिटणीस हरेश साठे, प्रवीण मोहोकर, नितीन कोळी, राजू गाडे यांनी परिश्रम घेतले.

*वृक्षारोपण मोहिमेत सर्व सहभागी होतात, मात्र वृक्ष संवर्धनात एक पाऊल मागे जाते. झाडे लावण्याइतकीच महत्त्वाची जबाबदारी म्हणजे त्यांचे संगोपन व संवर्धन करणे. या पार्श्वभूमीवर माझे झाड ही अभिनव संकल्पना राबवण्यात आली आहे. या संकल्पनेच्या अनुषंगाने प्रत्येक नागरिकाने फक्त झाड लावण्यापलीकडे जाऊन ते झाड आपलेच समजून त्याची जबाबदारी स्वीकारावी. महाराष्ट्रभूषण तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने पनवेल तालुक्यातील पाले बुद्रुक येथे जवळपास पाच हजार वृक्षांचे रोपण करण्यात आले असून श्री सदस्य त्या ठिकाणी नियमित जाऊन त्या झाडांचे संवर्धन करत आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी एक प्रकारची जीवसृष्टी परत आली असून पनवेलला त्या रूपाने वैभव मिळाले आहे.*

**–प्रशांत ठाकूर, आमदार**

## रायगडात वार्षिक पर्जन्यमानाच्या ७३ टक्के पाऊस

या महिन्यात सरासरीपेक्षा कमी म्हणजे ६३.३ टक्के पाऊस पडला. ऑगस्ट महिन्यात साधारणपणे ८७४.५ मिमी पाऊस पडतो. या वर्षी त्या तुलनेत ७४४.२ मिमी पाऊस पडला. ऑगस्ट महिन्यात ८५.२ टक्के पाऊस पडला.

सप्टेंबर महिन्यात आतापर्यंत २१.१ टक्के पाऊस नोंदवला गेला आहे. एकूण पर्जन्यमानाच्या ७३.७ टक्के पाऊस पडला. सप्टेंबर महिन्याचे अद्याप २२ दिवस बाकी आहेत. अजूनही पाऊस पडू शकतो. त्यामुळे यंदा पर्जन्यमानाच्या ९० टक्के पाऊस पडेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

शासनाकडे जून ते सप्टेंबर या चार महिन्यांतील पावसाची मान्सून म्हणून नोंद केली जाते. यंदा मे महिन्यातच मान्सूनला सुरुवात झाली. मे महिन्यात ४५४.९५ मिमी पाऊस पडला, जो १४.६७ टक्के होता. मे महिन्यात पडलेल्या पावसाचा विचार केल्यास एकूण आतापर्यंत रायगड जिल्ह्यात ८७.७४ टक्के पाऊस पडला आहे.

यंदा दक्षिण रायगडच्या तुलनेत उत्तर रायगडात जास्त पाऊस पडला. उरण तालक्यात सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. या तालुक्यात १०३.८ टक्के पाऊस पडला आहे. अलिबाग तालुक्यात ९८.९ टक्के, पनवेल तालुक्यात ८०.६ टक्के, पेण तालुक्यात ९२.९ टक्के पाऊस पडला आहे. पोलादपूर, महाड, माणगाव, श्रीवर्धन, म्हसळा, तळा या तालुक्यांमध्ये ८० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस पडला. नैसर्गिक आपत्तीचा तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाड तालुक्यात यंदा कमी पाऊस पडला. या तालुक्यात ७२ टक्के पाऊस पडला आहे.

जिल्ह्यात धरण क्षेत्रामध्येही चांगला पाऊस पडला असल्याने लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील २८ लघुप्रकल्पांपैकी २५ लघुप्रकल्प पूर्णपणे भरले आहेत. त्याचबरोबर शेतीसाठीदेखील पूरक पाऊस पडला आहे.

कोकणातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत रायगड जिल्ह्यात सर्वात कमी पाऊस पडला आहे. ठाणे जिल्ह्यात ९०.६ टक्के पाऊस पडला. रायगडमध्ये ७३.९ टक्के, रत्नागिरीत ८६.८ टक्के, सिंधुदुर्गमध्ये ८७.५ टक्के, तर पालघरमध्ये ९४.४ टक्के पाऊस पडला. कोकणात एकूण पर्जन्यमानाच्या ८५.८ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

### पावसाची तालुकानिहाय टक्केवारी

अलिबाग ९८.९, पनवेल ८०.६, कर्जत ६३.०, खालापूर ७९.५, उरण १०३८, सुधागड ७३.४, पेण ९२.९, महाड ७२.०, माणगाव ६९.४, रोहा ८४.१, पोलादपूर ६३.८, मुरूड ९२.२, श्रीवर्धन ८३.०, म्हसळा ८३.९, तळा ८२.०. **एकूण : ७३.७ टक्के.**



**नवीन पनवेल :** नागोठणे येथील श्री अष्टविनायक पतसंस्थेचे अध्यक्ष विलास चौलकर यांचे पुत्र रोहित चौलकर व पत्नी स्वप्नाली चौलकर यांनी नुकतेच श्रीयश हॉस्पिटलच्या समोर न्यू कॅफे स्वरो बाईट्स या नावाचे कॅफे हाऊस सुरू केले असून त्याचे उद्घाटन रविवारी झाले. या वेळी विलास चौलकर, श्वेता चौलकर, राजेंद्र घोसाळकर, श्री अष्टविनायक पतसंस्थेचे संचालक रोहिदास हातनोलकर, रवींद्र वाजे, संजय पिंपळे, पांडुरंग कामथे, अशोक गोरे, प्रकाश चौलकर, जगदीश चौलकर, सुजित चौलकर, राज चौलकर, कौस्तुभ चौलकर, जयेश चौलकर आदी उपस्थित होते.

# कामोठ्यातील खून प्रकरणाचा शेवट

## फरार आरोपीला सहा वर्षानंतर हैदराबाद येथून अटक

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील जुई गावात सहा वर्षांपूर्वी एकाने आपल्या पत्नीला रॉकेलमध्ये पेटवले होते. पाच दिवसांनी उपचारादरम्यान या महिलेचा मृत्यू झाल्यापासून कामोठे पोलीस संशयित पतीचा शोध घेत होते, मात्र पोलिसांच्या विविध पथकाने शोध घेऊनही माथेफीरू पती सापडत नव्हता. अखेर कामोठे पोलिसांच्या अथक प्रयत्नानंतर पत्नीचा खून करून फरार असलेल्या आरोपी पतीला हैद्राबाद येथून अटक केली.




जुई गावातील एका भाड्याच्या घरात मनोहर सरोदे आणि त्याची पत्नी आणि मुले असे कुटूंबिय राहत होते. ४ डिसेंबर २०१९ रोजी मनोहरने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत तिला रॉकेल ओतून पेटवून टाकले. या घटनेनंतर मनोहर पळून गेला. तर मुलांची वाताहत झाली. दोन मुलांना अनाथ आश्रमात आश्रय घ्यावा लागला. पोलिसांच्या वेगवेगळ्या पथकाने या घटनेनंतर मनोहरच्या गावापर्यंत शोध घेतला, परंतू घटना घडल्यावर मनोहर एकदा त्याच्या मूळ गावी नांदेड येथे गेला आणि त्याचे वडिल त्याला पोलिसांत घेऊन जात असल्याचे समजल्यावर तो तेथून पळाला. त्यानंतर तो गावी कधीच परतला नाही.

पोलिसांनी अनेकदा शोध घेऊनही मनोहर सापडत नसल्याने हे प्रकरण २०२३ मध्ये बंद करण्यात आले, परंतू नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी सध्या नवी मुंबईतील सर्वच पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना ज्या प्रकरणातील आरोपी अनेक वर्षे फरार आहेत यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानूसार पोलीस उपायुक्त प्रशांत मोहीते यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम यांच्या नेतृत्वाखाली कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी जुई गावातील महिलेच्या खूना प्रकरणाची पुन्हा झाडाझडती घेण्याचे आदेश सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत तायडे यांना दिले. पोलीस अधिकारी प्रशांत तायडे यांनी हे तपास बंद प्रकरणाची फाईल पुन्हा एकदा उघडून त्या प्रकरणाचा तपास सुरू केला.

फरार मनोहरच्या एका दूरच्या नातेवाईकाने पोलिसांना दिलेल्या माहितीनूसार मनोहर सध्या स्वताचे नाव बदलून हैद्राबाद येथे राहत असून तो नवीन नावाने वावरतो. तसेच त्याची नांदेड येथे राहणारी मुलगी व जावयाच्या तो संपर्कात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. याच माहितीच्या आधारावर कामोठे पोलिसांनी मनोहरची मुलगी व जावयाचा मोबाईलनंबरवर फेब्रुवारी ते जून महिन्यापर्यंत पाळत ठेवली. कोणकोणत्या मोबाईल नंबरवरून या दोन मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला जातोय. याचे दोन महिने पोलिसांनी निरीक्षक केले.

जून महिन्यात मनोहरचा नंबर सापडल्यानंतर त्याच्या मोबाईलवर पाळत ठेवल्यानंतर त्याचा हैद्राबाद (तेलंगणा) येथील बगलागुंडा पोलीस ठाणे हद्दीतील जहांगिराबाद येथील पत्ता पोलिसांना सापडला. कामोठे पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकारी तायडे यांचे पोलीस पथक हवालदार संजय झोळ, पोलीस नाईक सचिन ठोंबरे, पोलीस नाईक प्रविण पाटील, शिपाई प्रमोद कोकाटे यांनी या शोधमोहीमेत सखोल तपास केला. ५० वर्षीय मनोहरला अटक करून पनवेल येथील न्यायालयासमोर हजर करण्यात आले. त्याने दारूच्या नशेत पत्नीवरील संशयामुळे तिला पेटवून दिल्याचे पोलिसांना सांगीतले. सध्या मनोहर पिंटू सींग या नावाने वावरत होता. भूशाच्या गाडीवर क्लिनरचे काम करून तो स्वतःचा उदरनिर्वाह करत होता. न्यायालयाने त्याच्याकडून अधिक माहिती मिळविण्यासाठी पोलिसांना चार दिवसांची पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# सिडको विस्थापित गावांना मिळणार जुनी ओळख!

## दहा गाव समिती आणि समीर केणी यांच्या पाठपुराव्याला यश

**पनवेल : वार्ताहर**



**विमानतळबाधित गावांना ओळख मिळून देण्यासाठी दहा गाव समिती आणि आम्ही पाठपुरावा केला होता. त्याला पनवेल आणि उरणच्या आमदारांनी पाठबळ दिले. त्यामुळे आता आम्हाला आमची जुनी ओळख मिळणार आहे. यामुळे आमच्या भागातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला असून त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.**
**-समीर मदन केणी,**
पंचायत समिती अध्यक्ष, वडघर विभाग भाजप

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे चिंचपाडा, कोल्ही, कोपर, वाघीवली वाडा, वरचे ओवळे, कोंबडभूजे, तरघर, गणेशपुरी आणि उलवे ही गावे विस्थापित झाली, पण त्यांच्या खरी ओळख जपण्याऐवजी सिडकोने त्यांना आर-१, आर-२, आर-३, आर-४, आर-५ अशी नवीन नावे दिली आणि गावांचा इतिहास व संस्कृती पुसून टाकली. या गावांना त्यांची जुनी ओळख कायम राहावी यासाठी दहा गाव समिती आणि भाजपचे समीर केणी यांनी पाठपुरावा केला होता. त्याला आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठबळ देऊन सिडकोने आता या गावांना जुनी ओळख कायम केली आहे.


सिडकोने पनवेल परिसरात होणाऱ्या विमानतळाच्या बांधणीसाठी चिंचपाडा, कोल्ही कोपर, पारगाव, ओवळे, कोंबडभुजे, उलवेसारख्या भागातील जमिनी संपादित केल्या जमिनी संपादित करताना त्यांना मोबदला म्हणून २२.५ टक्के प्रमाणे भूखंड देण्यात आले. नवी मुंबई विमानतळ उभारताना जी गावे विस्थापित आली आहेत त्यांना सिडकोने भूखंड देऊन तेथे इमारती उभ्या राहिल्या. गावाचे गावपण जाते की काय असा प्रश्न तेव्हा अनेकांना पडू लागला. भूखंडावर इमारती उभ्या राहिल्या. भूखंड सिडकोचे असल्याने त्यांना नावेही सिडकोने दिली. काही ठिकाणी चिंचपाडावासीय ग्रामस्थ एका ठिकाणी, काही ठिकाणी कोल्ही कोपर मधील तर काही ठिकाणी वरचे ओवळे ग्रामस्थ एक भागात वसले, त्यांना सिडकोने आर २. आर ३, करंजाडे नोड अशी नावे दिली, पण त्यामुळे या गावांची जुनी ओळख पुसली गेली. ग्रामस्थांनी आपल्या रेशन कार्ड, आधार कार्ड, बँकेचे पासबुक यावरील पत्ता हा जुन्या गावातीलच आहे. कोणी पत्ता विचारला तर तो पत्तादेखील ग्रामस्थांना आता नीट सांगता येत नाही, त्यासाठी शासन दरबारी या नव्याने वसलेल्या वसाहतींनादेखील जुन्या गावांची नावे लावण्यात यावीत, अशी मागणी नागरिक करीत होते. याबाबत समीर केणी यांनी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्याकडे चर्चा केली असता बालदी यांनी सिडकोकडे पाठपुरावा सुरू केला होता. २०१७ सालापासून समीर केणी हे सिडको अधिकाऱ्यांना विचारणा करत होते, पण सिडकोचे अधिकारी टोलवाटोलवीचे काम करत असल्याचा आरोप केणी यांनी केला होता.

सहव्यवस्थापकीय संचालक यांच्या अहवालानुसार बैठक घेण्यात आली होती. या निवेदनामध्ये त्यांनी आर. १ आर.२. आर.३. आर ४, आर ५ क्षेत्रासाठी चिंचपाडा गावाचे ग्रामस्थांच्या मागणीनुसार गावासंबंधीत कागदपत्रावर नामांकनावर फलक उभारून देणेबाबत विनंती केलेली होती. वरील नियोजनकार व मुख्य अभियंता नवी मुंबई यांना आर.१. आर.२. आर.३. आर ४. आर ५ क्षेत्रासाठी चिंचपाडा गावाचे कागदपत्रावर नामांकरण व फलक उभारून देणेबाबतची योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी सूचना समीर केणी यांनी केली होती. याबाबत वडघर ग्रामपंचायतीने ठरावदेखील घेतला होता. आता मात्र सिडकोला दहा गाव समिती आणि भाजपचे पंचायत समिती अध्यक्ष समीर केणी यांनी झुकवले आहे. सिडकोने समीर केणी यांची मागणी आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठबळाने मान्य केली असून या गावांना आता त्यांची जुनी ओळख कायम मिळणार आहे.

# खड्डे भरल्याने वाहतूक सुरळीत

**पनवेल : वार्ताहर**

ऐन सणासुदीच्या दिवसांमध्ये पनवेल जवळील पळस्पे परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. याला उपाय म्हणून पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने कर्तव्यावर असताना त्या परिसरातील रस्त्याला पडलेले खड्डे बुजवून घेतल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली आहे.



सध्याच्या सणासुदीच्या दिवसांमुळे पनवेल शहर पोलीस ठाण्यातील पोलिसांची विविध पथके हे पळस्पे फाटा राहूल हॉटेल परिसर त्याचप्रमाणे मुंबई-पुणे महामार्गावर कर्तव्य बजाविण्यासाठी कार्यरत आहेत. यावेळी त्यांना रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यामुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे लक्षात आले. या संदर्भात त्यांनी वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः रस्त्यावर उतरुन हे खड्डे बुजवून घेण्यास सुरूवात केली. त्याचा फायदा येथून ये-जा करणार्यांना वाहन मालकांना झाला व मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक कोंडी ही आता सुरळीत होताना दिसत आहे. याबद्दल चाकरमान्यांनी पनवेल शहर पोलिसांचे आभार मानले आहेत.

# शॉक लागून बैलाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

महावितरणच्या तुटलेल्या केबलचा शॉक लागल्याने आंबिवली येथील शेतकऱ्याच्या बैलाचा मृत्यू झाला.

बाळाराम शंकर पाटील हे आंबिवली येथे राहत असून त्यांच्या शेतीच्या परिसरात एका विद्युत खांबावरील केबल तुटली होती. त्यांनी याबाबत महावितरणच्या वायरमेनला चार ते पाच दिवसांपूर्वी कळवले होते, मात्र कोणीही त्या ठिकाणी काम करण्यात आले नसल्याचा आरोप पाटील यांनी केला. त्या तुटलेल्या केबलचा बैलाला स्पर्श झाल्याने यात बैलाचा मृत्यू झाला. त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले. केबल तुटलेली असल्याने मनुष्यहानीदेखील होऊ शकते. वायरमेनच्या बेपरवाईमुळे ही घटना घडली असल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे नुकसान भरपाई मिळावी आणि वायरमेनवर कारवाई व्हावी, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

# पंजाबमधील पूरग्रस्तांसाठी आर्थिक मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हरियाणा-राजस्थान ट्रान्सपोर्ट मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमानाने पंजाब येथे आलेल्या महापूरसाठी कळंबोली गुरुद्वारा येथे दोन लाख रुपयांचे आर्थिक मदत करण्यात आली. प्रबंधक गुरुद्वारा समिती यांना सदर निधी सुपूर्द करण्यात आला. या वेळी पनवेल महापालिका माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा, राजबीर कासवाण, संदीप घनगस, ओम प्रकाश मुंड, सुरेश वर्मा, प्रदीप शर्मा, मनोज शर्मा आदींचे सहकार्य लाभले.



पंजाब येथे आलेल्या महापुरामध्ये शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जीवितहानीदेखील झाली आहे. अनेक प्राणी यांचीदेखील जीवित हानी झाली आहे. हे नुकसान हे भरून येणारे नाही पण माणुसकीच्या नात्याने त्यांना खारीचा वाटा मदत देण्यात आली.

# पनवेलमध्ये जिवंत सातबारा मोहिमेची अंमलबजावणी

**खारघर : प्रतिनिधी**

जिवंत सातबारा मोहीम राबवण्याचे आदेश दिले होते. यात सातबारा उताऱ्यावरील मृत खातेदारांची नावे कमी करून त्यांच्या वारसांची नावे लावण्यात आली. पनवेल तालुक्यात या मोहिमेचे उत्कृष्ट काम झाले. ६७० सातबारे अप्पर तहसील कार्यालयामार्फत जिवंत करण्यात आले.



शेतकरी मृत झाल्यानंतर त्याच्या वारसांमध्ये शेती आणि मालमत्तेच्या वाटणीवरून वाद निर्माण होतात. वारसदारांची संख्या अधिक असल्यास तसेच सहमतीने वाटप न झाल्यास ती जमीन तशीच पडून राहते. परिणामी, राज्यात अशी हजारो हेक्टर जमीन पडून आहे. सातबारा उतारा अद्यावत होत नसल्यामुळे शेतकऱ्यांसाठीच्या अनेक योजनांचा लाभ देता येत नाही. त्यासाठी मृत शेतकऱ्यांच्या वारसांचे नाव नियमानुसार सातबारा उताऱ्यावर लावण्यात येत आहे. या मोहिमेत आता कालबाह्य नोंदी जसे 'अपाक शेरा', 'एकुम' 'तगाई कर्ज', 'बंडिंग बोजे', 'भूसुधार कर', 'इतर पोकळीस्त' कमी होणार आहेत. त्यामुळे नियंत्रित सत्ता प्रकार, भोगवटा वर्ग एक आणि भोगवटा वर्ग दोन अशा स्वतंत्र नोंदी करून त्यानुसार सातबारा उतारा तयार केला जाईल.

**अपर तहसील कार्यालयामध्ये एकूण ८४९ सातबारापैकी ६७० सातबारा जिवंत करण्यात आले आहेत.**
**-जितेंद्र इंगळे-पाटील,**
अपर तहसीलदार, पनवेल





**पनवेल : येथील खवय्यांसाठी मोरया चाट कॉर्नर नव्याने सुरू झाले आहे. या कॉर्नरचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. निलेश पाटील यांनी हा चाट कॉर्नर सुरू केला असून या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. उद्घाटन समारंभाला भाजपचे पनवेल शहर मंडळ उपाध्यक्ष केदार भगत, अनंता पाटील, निलेश पाटील, सिद्धेश्वर काकडे, गणेश तांबे, संजय चोरमेकर, प्रवीण सपकाळे, प्रमोद भगत, निकेश पाटील, संदीप पानसरे, चिन्मय भगत, ध्रुव भगत आदी उपस्थित होते.**

# गव्हाण विद्यालयाच्या पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांना पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या विशेष उल्लेखनीय कार्यासाठी नाशिक येथील दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार (संघ) संस्थेच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून दिला जाणारा ' राष्ट्रीय दर्पण शिक्षक गौरव पुरस्कार २०२५ ' रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मधील पर्यवेक्षिका शशिकला चंद्रकांत पाटील यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्थे ( संघ ) च्या वतीने विविध क्षेत्रातील योगदान देणाऱ्या मान्यवरांना या वेळी गौरविण्यात आले.

शशिकला चंद्रकांत पाटील यांना शैक्षणिक कार्यात विद्यार्थी संशोधन कार्यासाठी जाहीर झालेल्या ह्या पुरस्काराचे वितरण रविवारी (दि.७) नाशिक येथील रोटरी क्लब सभागृह, गंजमाल येथे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाचे संचालक महेंद्र देशपांडे आदी प्रभृतींच्या हस्ते करण्यात आले.

शशिकला पाटील ह्या रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागातील उपक्रमशिल अध्यापिका म्हणून गत २३ वर्षांपासून कार्यरत असून सहा महिन्यांपूर्वी पर्यवेक्षिका या पदावर बढतीने गव्हाण विद्यालयात कार्यरत झाल्या. या वेळी त्यांना दोन पुरस्कार प्राप्त झाले. या पुरस्कारासह शशिकला पाटील यांना वर्धा येथील मातृवृक्ष बहुउद्देशीय शैक्षणिक व सामाजिक संस्था, मंगल यश एज्युकेशन कन्सल्टन्सी व शिक्षक ध्येय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय उपक्रम स्पर्धेत माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात सहभाग नोंदवून सादर केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रमातून अध्यापनाच्या विविध पद्धती या नवोपक्रमा प्रित्यर्थ कर्तृत्ववान शिक्षक पुरस्कार २०२५ प्राप्त केल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.




शशिकला पाटील यांना यापूर्वीही विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून त्यामध्ये रयत शिक्षण संस्थेचा आदर्श विज्ञान शिक्षक पुरस्कार, रायगड जिल्हा आदर्श माध्यमिक शिक्षक पुरस्कार तसेच सर फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार इत्यादिंचा समावेश आहे.

या शैक्षणिक वर्षात दुहेरी पुरस्कारार्थी ठरल्याबद्दल पाटील यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.




पनवेल : भाजपचे नवीन पनवेल शहर मंडळ सरचिटणीस भीमराव पोवार यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पोवार कुटुंबियांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# नेरे येथून युवक बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणाला काहीही न सांगता ३१ वर्षीय मुरारी शुभकांत झा हा, कोणार्क सिटी कोप्रोली नेरे येथून निघून गेल्याने तो हरवला असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. तो अंगाने मध्यम असून रंग सावळा आणि चेहरा उभट आहे. त्याची उंची ५.११ फूट असून अंगात सफेद शर्ट, निळी जीन्स पॅन्ट आणि पायात चप्पल घातली आहे. त्याच्या पाठीवर चामखीळ असून उजव्या हातामध्ये निळे आणि काळ्या रंगाचा धागा बांधलेला आहे. या तरुणाबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार अण्णासाहेब हसबे यांच्याशी संपर्क साधावा.

# व्यक्ती हरवल्याची तक्रार

**पनवेल :** जेवण करण्यासाठी घराबाहेर जातो असे सांगून एक व्यक्ती घराबाहेर पडला तो अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार उलवा पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. हसमुद्दीन इस्माईल अन्सारी (वय २२, रा.एलॲन्टटी कॉलनी, नवी मुंबई विमानतळ) रंग गोरा, उंची ५ फुट ४ इंच, अंगाने सडपातळ, डोळे काळे, नाक सरळ, केस लांब व काळे, दाढी मिशी आहे. अंगात सफेद शर्ट व पॅन्ट तसेच पायात चप्पल आहे. त्याला हिंदी व भोजपूरी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवा पोलीस ठाणे किंवा हवालदार दिपककुमार पाटील यांच्याशी संपर्क साधावा.


## संपादकीय

# निदर्शनांचा भडका

समाजमाध्यमांवरील बंदीच्या विरोधात तरुणांनी पुकारलेल्या आंदोलनातून नेपाळमध्ये अतिशय तणावपूर्ण स्थिती निर्माण झाल्याचे सोमवारी दिसून आले. यात काही आंदोलकांचा बळीही गेला असून अनेक जण जखमी झाले आहेत. समाजमाध्यमांवरील बंदी हे निमित्त असले तरी खरा असंतोष हा नेपाळमधील आर्थिक दुरवस्था व बेरोजगारीतूनच आला आहे.

नेपाळ सरकारने समाजमाध्यमांवर लादलेल्या बंदीविरोधात राजधानी काठमांडूमध्ये तेथील तरुणांनी रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने सुरू केल्याची दृश्ये सोमवारी वृत्तवाहिन्यांवरून जगभरात प्रसारित झाली. निदर्शक तरुणांनी सकाळीच नेपाळच्या संसद भवनाकडेही मोर्चा वळवला व बॅरिकेड तोडून आत घुसण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलिसांनी केलेल्या गोळीबारात आठ जण ठार झाल्याचे समजते. एका सरकारी इमारतीचा काही भागही निदर्शकांनी पेटवून दिला. त्यानंतर नेपाळमधील राष्ट्रपती भवन, पंतप्रधान निवासस्थान आदी परिसरात कर्फ्यू आदेश जारी करण्यात आले. या आक्रमक आंदोलनात तरुण आणि पोलिसांमध्ये झालेल्या संघर्षात १६ जणांचा मृत्यू झाल्याचे समजते. सुमारे १५० तरुणांना निरनिराळ्या रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहे. नेपाळमधील परिस्थिती अतिशय तणावपूर्ण आहे. नेपाळ सरकारने २८ ऑगस्ट रोजी सोशल मीडिया कंपन्यांना नोंदणी करण्यासाठी सात दिवसांची मुदत जाहीर केली होती, मात्र त्यानंतरही या कंपन्यांनी त्यादृष्टीने कोणतीच हालचाल केली नाही. अखेर ४ सप्टेंबरला नेपाळ सरकारने इन्स्टाग्रॅम, फेसबुक, युट्यूब व एक्स आदी २६ समाजमाध्यमांवर बंदी लादली, मात्र त्यातून देशातील तरुणांमध्ये असंतोष पसरला व नेपाळी कलाकारांनीही या निदर्शनांना पाठिंबा दिला. 'जनरेशन झी'च्या नेतृत्वाखाली ही निदर्शने झाली असून त्यात हजारो तरुणांनी सहभाग घेतला. जनरेशन झी म्हणजे १९९० ते २०१० दरम्यान जन्मलेली पिढी असे मानले जाते. समाजमाध्यमांवरील बंदीच्या विरोधात तसेच भ्रष्टाचाराच्या विरोधात तरुणांनी हे आंदोलन पुकारले असून आधी ऑनलाइन सुरु झालेले आंदोलन नंतर रस्त्यावर उतरले. समाजमाध्यमांवरील बंदीमुळे ऑनलाइन शिक्षण, व्यवसाय आणि दैनंदिन संवादात अडथळे निर्माण झाल्याचे तरुणांचे म्हणणे आहे. तर बंदी लादलेले समाजमाध्यम मंच नेपाळमध्ये नोंदणीकृत नाहीत असे सरकारचे म्हणणे होते. देशाला कमजोर करण्याचा प्रयत्न कुणी करत असेल तर तो सहन केला जाणार नाही अशी भूमिका नेपाळच्या पंतप्रधानांनी यासंदर्भात व्यक्त केली. तर नेपाळमधील आर्थिक मंदीमुळे नोकरीच्या संधी कमी झाल्याने तरुणांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे सांगितले जाते. चीनप्रमाणे नेपाळमध्येही समाजमाध्यमांवर सेन्सॉरशिप लादण्याचा प्रयत्न सुरू आहे, परंतु तरुणांनी आक्रमक आंदोलनातून त्यास विरोध दर्शवला आहे. नेपाळच्या अर्थव्यवस्थेची परिस्थिती बरी कधीच नव्हती. पर्यटनावर अवलंबून असलेल्या नेपाळला कोरोना महामारीनंतर आर्थिकदृष्ट्या सावरण्यास वेळ लागला आहे. शेजारी राष्ट्रांमधील घडामोडींचे परिणाम आपल्या देशावरही होत असतात. त्यामुळे भारताने नेपाळ सीमेलगत सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. या सीमाभागात पाकिस्तान आणि चीनकडून छुप्या हालचाली सुरू असतात. सुरक्षेच्या दृष्टीने तेथे लक्ष ठेवणे आवश्यक आहेच. गेल्या काही वर्षांत भारताच्या अनेक शेजारी राष्ट्रांमध्ये अराजकतासदृश परिस्थिती निर्माण होताना दिसते आहे. आर्थिक व राजकीय अस्थैर्य त्यामागे आहे. चीनवगळता भारताचे बहुतेक शेजारी देश हे भारतासोबतच ब्रिटिश राजवटीतून मुक्त झाले, परंतु भारताप्रमाणे प्रगती अन्य शेजारी देशांना साधता आलेली नाही. नेपाळमधील परिस्थितीचा भारतावर कुठल्याही तऱ्हेने नकारात्मक परिणाम होऊ नये याची काळजी घ्यावी लागणार आहे.

# सह्याद्रीच्या हृदयातील अभेद्य गड : प्रतापगड



सह्याद्रीच्या उंचसखल डोंगररांगांमध्ये, दाट जंगलांच्या कुशीत आणि नागमोडी घाटांच्या वळणावर अभिमानाने उभा असलेला प्रतापगड हा मराठा इतिहासातील एक सोनेरी पान आहे. या गडाचे सामरिक महत्त्व केवळ त्याच्या उंचसखल भौगोलिक रचनेत नाही, तर आजूबाजूच्या दऱ्या, खोऱ्या आणि घाटांवर ठेवलेल्या नियंत्रणातही दडलेले आहे. महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध डोंगरी किल्ला म्हणून या किल्ल्याची ओळख आहे. सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यात महाबळेश्वरच्या नैर्ऋत्येस १३ किमीवर हा किल्ला असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची १,०९२ मी. आहे. पूर्वेकडील बाजूस ३४० मी. आणि पश्चिमेकडे ८७० मी. खोल दरी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळी खोरे जिंकल्यानंतर मोरो त्रिंबक पिंगळे यांना १६५६मध्ये हा किल्ला बांधून घेण्याची आज्ञा दिली.

प्रतापगड हा बालेकिल्ला आणि त्याच्या सभोवतालचा खालचा भाग, अशा दोन प्रमुख भागात विभागलेला आहे. डोंगराच्या शिखरावर असलेल्या बालेकिल्ल्यात राजवाडा, सदर, केदारेश्वर मंदिरे, पाण्याच्या टाक्या आणि धान्य-रसद साठवणीसाठीच्या कोठाऱ्या यांसारखी महत्त्वाची बांधकामे होती, तर दक्षिण व पूर्व उतारावर बांधलेल्या खालच्या भागात पहिली तटबंदी आणि प्रचंड बुरुज शत्रूला दरीतच अडकवून ठेवण्यासाठी होती.

मुख्य किल्ला, माची आणि बालेकिल्ला असे या किल्ल्याचे तीन भाग होतात. मुख्य किल्ला व बालेकिल्ला भागांत तलाव असून संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्याच्या चोहोबाजूंस भक्कम तटबंदी व बुरूज आहेत. बालेकिल्ल्याचे क्षेत्रफळ ३,६६० चौमी, तर मुख्य किल्ल्याचे ३,८८५ चौमी असून दक्षिणेकडील बुरूज १० ते १५ मी. उंचीचे आहेत. त्यांपैकी रेडका, राजपहारा, केदार इ. बुरुजांचे अवशेष टिकून आहेत. बुरूज वैशिष्ट्यपूर्ण असून निमुळत्या डोंगर धारेच्या शेवटी आहे. या भागाला माची म्हणतात. कारण अशाच स्वरूपाचे बांधकाम राजगड (सुवेळा व संजीवनी), तोरणा ( झुंजार) या किल्ल्यांवरील माच्यांना आहे. किल्ल्याची तटबंदी काही ठिकाणी तब्बल ४० फूट उंच असून तिच्या भक्कम रचनेमुळे प्रतापगड अभेद्य बनला होता. संपूर्ण बांधकाम काळ्या पाषाणात केले गेले आहे. गडाच्या उंच बुरुजांवरून जावळीच्या खोऱ्यातील डोंगर-दऱ्यांवर सतत नजर ठेवता येत असे, त्यामुळे शत्रूच्या हालचाली वेळेत ओळखणे सोपे होत असे.

मुख्य किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी दोन दरवाजे पार करून जावे लागते. दोन्ही दरवाजांवर शरभाच्या प्रतिमा दिसतात. दोन दरवाजे पार केल्यावर तुळजा भवानीचे मंदिर आहे. या देवालयासमोर दोन उंच दीपमाळा आहेत. त्या जवळच नगारखान्याची इमारत आहे. भवानी देवीचे मूळ मंदिर दगडी गाभाऱ्याचे होते. १८२०मध्ये सातारच्या प्रतापसिंह महाराजांनी तेथे लाकडी मंडप बांधला.

अरुंद, नागमोडी चढणाऱ्या वाटा आणि दारांच्या पुढे लपवलेले मजबूत अडथळे यामुळे कुणालाही सरळपणे गडावर प्रवेश करणे शक्य नव्हते. महादरवाजा तर संरक्षणकलेचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. गोमुखी शैलीत बांधलेला हा दरवाजा रचनेत इतका कुशल होता की, अरुंद मार्गाने आत येणाऱ्या शत्रूंना दोन्ही बाजूंच्या बुरुजांतून सहज हल्ल्याच्या टप्प्यात आणले जाई.

प्रतापगडाचे एक अनोखे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सुसंरचित जलव्यवस्था. किल्ल्यावर चार प्रमुख पाण्याच्या टाक्या आहेत. यापैकी दोन बालेकिल्ल्यात तर दोन खालच्या भागात आहेत. पावसाचे पाणी साठवण्यासाठी नैसर्गिक उतारांचा कुशलतेने वापर करण्यात आला होता. त्यामुळे गडावरील लोकसंख्येला वर्षभर पुरेल इतका पाणीपुरवठा व्हायचा. ही योजना मराठ्यांच्या अभियांत्रिकी व व्यूहनीती कौशल्याचा अद्वितीय नमुना ठरते.

प्रतापगडचे ऐतिहासिक महत्त्व अफझलखान छत्रपती शिवाजी महाराज भेट व त्याप्रसंगी झालेला अफझलखानाचा वध या घटनेमुळे वाढले (१६५९). छत्रपती राजाराम महाराज सुद्धा जिंजीस जात असताना प्रथम प्रतापगडास आले. स्वातंत्र्योत्तर काळात या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला. त्याचे अनावरण १९५७च्या नोव्हेंबर महिन्यात तत्कालीन पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू यांनी केले.

आजही हजारो लोक केवळ त्या क्षणाशी नाते जोडण्यासाठी प्रतापगडावर भेट देतात. गडावर दरवर्षी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. अफझलखान भेटीचे नाट्यरूप सादरीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी निगडित उपक्रम यामुळे प्रतापगड महाराष्ट्राच्या अस्मिता आणि सांस्कृतिक एकतेचे केंद्र ठरतो.

प्रतापगड मराठ्यांच्या धैर्य, रणनीती आणि स्वराज्याच्या स्वप्नाचा जिवंत साक्षीदार आहे. सह्याद्रीच्या कुशीत उभा असलेला हा गड आजही भूतकाळ आणि वर्तमान यांना जोडणारा एक अढळ दुवा आहे.

युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा मानांकन दिले असून त्यात प्रतापगडाला विशेष स्थान मिळाले आहे. त्यामुळे प्रतापगड आज केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता जगाच्या सांस्कृतिक वारशाचा एक अनमोल ठेवा म्हणून गौरवला जातो.

**-संजय डी.ओरके, विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**

# प्रसिद्ध गायक व संगीतकार श्रीधर फडके



श्रीधर सुधीर फडके यांचा जन्म विख्यात गायक व संगीत दिग्दर्शक सुधीर फडके आणि विख्यात पार्श्वगायिका ललिता फडके यांच्या पोटी मुंबई येथे ९ सप्टेंबर १९५० साली झाला. त्यामुळे श्रीधर यांना घरातून संगीताचा वारसा मिळाला आणि त्यांच्यावर बालपणापासून संगीताचे उत्तम संस्कार झाले.

मुंबईतील बालमोहन विद्यामंदिर, लोकमान्य विद्यामंदिरात त्यांचे शालेय शिक्षण झाले व रूपारेल महाविद्यालयातून एमएस्सी पदवी घेऊन पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट ऑफ न्यूयॉर्क येथून त्यांनी एमएस कॉम्प्युटर पूर्ण केले आणि त्यात चांगले करिअरसुद्धा केले. शिकत असताना त्यांनी भावगीतांची ध्वनिफीत काढली होती. संगीत क्षेत्रातील श्रीधर फडके यांची पहिली लक्षणीय कामगिरी म्हणजे त्यांनी संत ज्ञानदेव विरचित हरिपाठातील 'देवाचिये द्वारी' या अभंगाला लावलेली सुमधुर चाल. या वेळी ते अमेरिकेत शिक्षण घेत होते.

'लक्ष्मीची पावले' हा श्रीधर फडके यांनी संगीत दिलेला पहिला चित्रपट होय. यातील 'फिटे अंधाराचे जाळे' हे गीत फारच गाजले. याला अमाप लोकप्रियता लाभल्यामुळे संगीत विश्वातील त्यांचे स्थान भक्कम झाले.

'ओंकार स्वरूपा', 'ऋतु हिरवा' या ध्वनिफितींतील त्यांनी स्वरबद्ध केलेली गीते अत्यंत लोकप्रिय ठरली. 'काही बोलायाचे आहे' ही त्यांनी गायलेल्या गीतांची ध्वनिफीत, पद्मजा फेणाणी-जोगळेकर यांच्या सहगायनातील 'हे गगना', आरती अंकलीकर व सुरेश वाडकर यांनी गायलेली 'तेजोमय नादब्रह्म' आणि 'सुखवरदा रामा', 'संगीत मनमोही रे', इ. ध्वनिचकत्यांतील गीते लोकप्रिय झालेली आहेत. लोकप्रियतेच्या मानांकनासाठी त्यांच्या चार ध्वनिचकत्यांना 'प्लॅटिनम डिस्क' बहाल झाली आहे.

एअर इंडियातील वरिष्ठ पदावरून ते निवृत्त झालेत. हा संगीताचा छंद, त्यांनी नोकरी सांभाळून जोपासला. निवृत्तीनंतर पूर्ण वेळ संगीतकार व गायक म्हणून त्यांची वाटचाल चालू आहे. (साभार : इंटरनेट)




## रात्री वाय-फाय बंद करायला हवं का?



आजकाल इंटरनेट आपल्या जीवनाचा एक भाग बनला आहे. दिवस असो वा रात्र, प्रत्येक घरात वाय-फाय चालू असतं. स्मार्टफोन, लॅपटॉप, स्मार्ट टीव्ही आणि इतर गॅझेट्स इंटरनेटशिवाय अपूर्ण वाटतात. पण रात्री झोपताना वाय-फाय चालू ठेवणं खरोखर आवश्यक आहे का असा विचार तुम्ही कधी केला आहे का? खरंतर, रात्री वाय-फाय बंद केल्यामुळे अनेक फायदे होतात जे बहुतेक लोकांना माहित नाहीत.

आरोग्याला याचा मोठा फायदा होतो. अनेक वैज्ञानिक संशोधनातून असं दिसून आलं आहे की, सतत वाय-फाय सिग्नलमध्ये राहिल्याने झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो. ऑस्ट्रेलियाच्या आरएमआयटी विद्यापीठाच्या (२०२४) रिपोर्टनुसार, वाय-फाय जवळ झोपणाऱ्या सुमारे २७ टक्के लोकांना निद्रानाशासारख्या समस्या असतात. रात्री वाय-फाय बंद केल्यास मेंदूला रेडिओ वेव्सच्या संपर्क कमी येतो आणि झोप चांगली लागते. यामुळे शरीराला नीट विश्रांती मिळते आणि दुसऱ्या दिवशी सकाळी व्यक्तीला अधिक ताजेतवानं वाटतं.

सायबर सिक्योरिटीपासून संरक्षण

दुसरा फायदा सायबर सुरक्षेशी संबंधित आहे. जेव्हा वाय-फाय रात्रभर चालू असतं, तेव्हा तुमचं नेटवर्क हॅकिंग आणि नको असलेल्या लॉगिनसाठी खुलं असतं. बऱ्याचदा लोक झोपताना लक्ष देत नाहीत की दुसरे कोणीतरी त्यांचं नेटवर्क वापरू शकतं. वाय-फाय बंद केल्याने डेटा चोरी आणि प्रायव्हसीला धोका निर्माण होण्याची शक्यता कमी होते.

विजेची बचत

तिसरा फायदा म्हणजे विजेची बचत होते. वाय-फाय राउटर जास्त वीज वापरत नसला तरी, तो २४ तास चालवल्याने वर्षभरात बरेच युनिट खर्च होतात. जर तुम्ही रात्री तो बंद करण्याची सवय लावली तर वीज बिल देखील कमी होईल. याशिवाय वाय-फाय बंद केल्याने गॅझेट्सचं आयुष्य देखील वाढतं. ते सतत चालू ठेवल्याने राउटर आणि कनेक्टेड डिव्हाइसेसवर दबाव येतो, ज्यामुळे त्यांचं आयुष्य कमी होऊ शकतं. परंतु जर त्यांना रात्रभर विश्रांती मिळाली तर ते बराच काळ चांगलं काम करतात.

# धवल क्रांतीचे जनक डॉ. वर्गीस कुरियन



### निमित्त

भारतातील धवल क्रांतीचे पितामह डॉ. वर्गीस कुरियन यांची आज ९८वी पुण्यतिथी. त्यांचा जन्म २६ नोव्हेंबर १९२१ रोजी केरळ राज्यातील कोझिकोड (कालिकत) शहरात झाला. त्यांचे वडील सरकारी रुग्णालयात शल्यतज्ज्ञ होते. कुरियन यांनी मद्रासच्या लॉयोला कॉलेजमधून भौतिकशास्त्रातील पदवी मिळवली. विद्यार्थी दशेत त्यांनी लॉयोला कॉलेजचे क्रिकेट, बॅडमिंटन, मुष्टियुद्ध आणि टेनिसमध्ये प्रतिनिधित्व केले होते. त्यांनी गिंडी येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि मद्रास (सध्याच्या चेन्नई) विश्वविद्यालयाची यंत्र अभियांत्रिकी (मेकॅनिकल इंजिनीअरिंग) पदवी मिळविली.

अल्प काळासाठी टाटा आयर्न अँड स्टील कंपनीत नोकरी करून वर्गीस यांनी इंपिरियल इन्स्टिट्यूट ऑफ निमल हजबंड्री ॲण्ड डेअरी इंजिनीअरिंगसाठी प्रवेश घेतला. सध्या ही संस्था बंगळुरूत असून आता या संस्थेचे नाव नॅशनल डेअरी रिसर्च इन्स्टिट्यूट-सदर्न रिजनल सेंटर आहे. डेअरी टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमासाठी त्यांना मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीत प्रवेश हवा होता. प्रवेशासाठी कुरियन यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळाली होती, पण प्रवेशपूर्व अट म्हणून मेटॅलर्जीत अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवीबरोबर डेअरी इंजिनीअरिंग हा दुय्यम विषय घेणे अनिवार्य होते. या अटींची पूर्तता करून मिशिगनमधून मास्टर्सची पदवी मिळवून ते भारतात परतले. डेअरी इंजिनीअर म्हणून कुरियन १९४९मध्ये आणंदच्या गव्हर्नमेंट रिसर्च क्रीमरीत पाच वर्षांच्या कालावधीसाठी रुजू झाले. तेथे त्यांचा त्रिभुवनदास पटेल यांच्याशी परिचय झाला.

त्रिभुवनदास यांना त्या काळी लहान दूध उत्पादकांसाठी आणंद येथे सहकारी दूध संघटना स्थापन करायची होती. मध्यंतरीच्या काळात १९५२-५३मध्ये कुरियन यांनी भारत सरकारच्या पुरस्काराने न्यूझीलंडमध्येही दुग्ध यांत्रिकी शिक्षण घेतले तसेच न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियामधील सहकारी दूध व्यवस्थेचाही अभ्यास केला. त्रिभुवनदास पटेल यांचा उपक्रम भावल्यामुळे सुरक्षित सरकारी नोकरी सोडून कुरियन यांनी खेडा जिल्ह्यातील चळवळीत उडी घेतली. कुरियन यांनी न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियात केलेल्या सहकारी दूध व्यवस्थेच्या अभ्यासाचा खेडा डिस्ट्रिक्ट कोऑपरेटिव्ह मिल्क प्रॉड्युसर्स युनियन लिमिटेड (KDCMPUL) म्हणजेच अमूलची बांधणी करण्यासाठी उपयोग केला.

कुरियन यांनी १९५५मध्ये न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियात केलेल्या अभ्यासातून प्रेरणा घेऊन जगातील पहिला म्हशीच्या दुधाची पावडर बनवण्याचा प्रकल्प आणंदमध्ये केला. दुधातील पाण्याचे प्रमाण कमी करून अतिशय दाट (कन्डेस्ड) टिकाऊ दूध बनवण्याचे तंत्र कुरियन यांचे अमेरिकेत राहणारे अभियंता वर्गमित्र, एच.एम. दलाया यांनी विकसित केले होते.

कुरियन यांची योजकता केवळ दुधापुरतीच मर्यादित राहिली नाही. तेलबिया आणि खाद्य तेलाच्या बाबतीतही भारत स्वयंपूर्ण व्हावा अशी भारत सरकारची आकांक्षा होती. पूर्वानुभवामुळे कुरियन यांना हे केवळ तीन वर्षांत साध्य झाले. आपल्या आठवणी आणि विचार कुरियन यांनी तीन पुस्तकांत नोंदवून ठेवल्या आहेत. त्यांच्या पुस्तकांची नावे आहेत, 'आय टू हॅड ड्रीम', 'द मॅन हू मेड द एलिफंट डान्स' आणि 'न अनफिनिश्ड ड्रीम.' त्यांना विविध पुरस्कार, मान-सन्मान मिळाले. गुजरातेतील नडियाद येथे ९ सप्टेंबर २०१२ रोजी अल्पशा आजारानंतर त्यांचा मृत्यू झाला.

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

### आतड्यांतील घाण साफ करतात 'हे' पाच पदार्थ



लहान आतडे आणि मोठे आतडे हे आपल्या शरीराच्या पचनसंस्थेतील महत्त्वाचे अवयव आहेत. अन्नातून निरोगी आणि पौष्टिक गोष्टींचे पचन करणे हे आतड्यांचे कार्य असते, पण शरीरातील टाकाऊ पदार्थ काढून टाकण्याचे कामही ते करतात. त्यामुळे निरोगी शरीरासाठी आतड्यांचे आरोग्य सुस्थितीत राखणे गरजेचे आहे. आतड्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी आता काय खावे, काय खाऊ नये याबाबत अनेक जण सजग आहेत. या पार्श्वभूमीवर आतड्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी आपण कसे जेवावे हे माहीत असणेही गरजेचे आहे.

आतड्यांमधील घाण काढून टाकतील हे पाच सुपरफूड्स

१. दही

दही एक प्रो-बायोटिक आहार आहे, ज्यामध्ये आतड्यांसाठी अनुकूल जीवाणू असतात. दही आतड्यांतील चांगल्या जीवाणूंची संख्या वाढविण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करते. त्याचबरोबर अनारोग्यास कारणीभूत ठरणारे प्रतिकूल जीवाणू काढून टाकण्यासाठीही दही हा उत्तम स्रोत आहे.

२. कच्ची केळी

कच्ची केळी खाल्ल्याने आरोग्यदायी आत मायक्रोबायोम वाढण्यास मदत होते. ते प्रतिरोधक स्टार्चने समृद्ध असतात आणि रक्तातील साखरेचे नियमन करू शकण्यासह इन्सुलिन संवेदनशीलता सुधारू शकतात.

३. अळशी

विरघळणारे फायबर आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिडस् यांनी समृद्ध असलेली अळशी आतड्यांची जळजळ कमी करते आणि हृदयाच्या आरोग्यास समर्थन देते. दररोज आपल्या आहारात एक-दोन चमचे अळशीचा समावेश करा.

४. ॲव्होकॅडो

विरघळणाऱ्या फायबरव्यतिरिक्त यात निरोगी चरबी असते. त्यामुळे पोषक शोषण क्षमता सुधारते आणि निरोगी आतड्यांतील मायक्रोबायोमला समर्थन देते. दिवसाकाठी अर्धा ॲव्होकॅडो चांगला आहे.

५. ग्लुटेनमुक्त ओट्स

ग्लुटेनमुक्त ओट्स हा विरघळणाऱ्या फायबरचा चांगला स्रोत आहे आणि त्यामुळे आतड्यांच्या आरोग्यास मदत मिळते. तसेच त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित होऊन, हृदयाच्या आरोग्यास प्रोत्साहन लाभते. दररोज ३० ग्रॅम (एक वाटी) शिजविलेले ग्लुटेनमुक्त ओट्स सेवन करण्याचे लक्ष्य ठेवा.

# माथेरानच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपशिवाय पर्याय नाही -चंद्रकांत जाधव

**माथेरान : बातमीदार**

माथेरान शहरातील प्रलंबित समस्या सोडविण्याच्या कायम प्रयत्नात असणारा माथेरानमधील एकमेव भारतीय जनता पक्ष अग्रेसर असल्याचे दिसून येत आहे. शहरातील नागरिकांना सुरळीत रस्ते, नियमित विद्युत व पाणी पुरवठा, स्वच्छता, पार्किंग समस्या, पनवेल धोदाणी पर्यायी रस्ता, मिनी बस सेवा, मिनी ट्रेन सेवा, नेटवर्क अशा अनेक समस्या सोडविण्यासाठी कायम प्रयत्नात असणाऱ्या माथेरान मधील भारतीय जनता पक्षाशिवाय आगामी काळात विकासात्मक दृष्टीने पर्याय नसल्याचे मत माजी उप नगराध्यक्ष तथा भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते चंद्रकांत जाधव यांनी सांगितले.



इथली राजकीय मंडळी गावात काय काय समस्या निर्माण झाल्या आहेत, पर्यटकांना सेवासुविधा उपलब्ध होत नाहीत, सर्वसामान्य लोकांच्या आवश्यक गरजा असोत किंवा वाहतुकीचा प्रश्न असो याकडे दुर्लक्ष करून नगरपालिका सभागृह आपल्या ताब्यात केव्हा येतंय त्यासाठी सर्व खटाटोप सुरू असून सद्यस्थितीत दिवसेंदिवस राजकीय हालचालींना वेग येत आहे. इच्छुकांना नगरपरिषदेच्या मुख्य खुर्चीवर आसनस्थ होण्याचा मोह आवरता येत नसल्याने दिवसाढवळ्या प्रथम नागरिक होण्याची स्वप्ने पाहताना अनेकजण दिसत आहेत आणि त्यांनी त्याप्रमाणे आतापासूनच काही मोजक्याच कार्यकर्त्यांना हाताशी धरून पुढील आमिषे देऊन आणि चिरीमिरी देत सुरुवातसुध्दा केल्याचे दिसून येत आहे. अद्याप नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर झालेले नसले तरी सुद्धा आपणच या पदाचे प्रबळ दावेदार असल्याचा अविर्भाव आणून गुप्त बैठका घेण्यास सुरुवात केल्याचे दिसून येत आहे. भले कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता ज्या ज्या कार्यकर्त्यांनी मागील काळात ज्या नेत्यांची साथ सोडून अन्य पक्षात प्रवेश केले आहेत तेच नेते आगामी काळात एकत्रित गुण्यागोविंदाने निवडणूकीला सामोरे जाऊन कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करून नगरपरिषदेच्या सभागृहात केवळ मलिदा चाखण्यासाठी पुढाकार घेण्याच्या तयारीत आहेत.

सर्वकाही राजकीय घडामोडी सुरू असल्या तरीसुद्धा यावेळी नगराध्यक्ष पदावर भाजपचा नगराध्यक्ष विराजमान होणार आहे त्यामुळे ज्यांनी ज्यांनी आतापासूनच गुडघ्याला बाशिंग बांधले आहे त्यांना एकवेळ भाजपच्या गोटात जाऊन नगराध्यक्ष पद प्राप्त होऊ शकते अन्यथा गटातटाच्या राजकारणात सर्वसामान्य कार्यकर्त्यांना नाहक होरपळून निघावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरिष्ठ नेत्यांनी माथेरान साठी भाजपचा नगराध्यक्ष होईल, असे स्पष्ट केल्याचे बोलले जात आहे त्यामुळे कुणी कितीही स्वप्ने पाहिली तरी ती व्यर्थ जातात की काय असाही प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित केला जात आहे.

# मुरूड शहरातील जलशुद्धीकरणाच्या दुरूस्तीबाबत मंत्री तटकरेंना निवेदन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहराला गेल्या अनेक महिन्यापासून दूषित व शुद्धीकरण न होता पाण्याचा पुरवठा मुरूड नगर परिषदेकडून केला जात आहे. मुरूड शहर वासियांकडून या बाबत कैफियत मांडूनसुद्धा शहराला शुद्ध पाण्याचा पुरवठा होत नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मुरूड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ यांनी मंत्री अदिती तटकरे यांना निवेदन दिले.

या वेळी त्यांच्यासमवेत मुरूड तालुका कृषी उत्पन्न बाजारसमितीचे चेरमन मनोज भगत, राष्ट्रवादीचे रायगड जिल्ह्याचे सोशल मीडिया सेलचे उपाध्यक्ष हसमुख जैन, माजी नगरसेवक विश्वास चव्हाण आदी उपस्थित होते.

या वेळी संजय गुंजाळ यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार व खासदार सुनील तटकरे यांच्या बहुमूल्य सहकार्य मिळाल्यामुळे



मुरूड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पाईप लाईन व जल शुद्धीकरण प्रकल्प मिळाले होते, परंतु मुरूड नगर परिषद पाणी पुरवठा विभागाकडून जल शुद्धीकरण प्रकल्पाची व्यवस्थित निगा न राखल्यामुळे आज हा बंद अवस्थेत असल्याने मुरूड शहराला शुद्ध पाणी मिळत नाही. परिणामतः मुरुड शहराला दूषित पाणी पुरवठा होत आहे. या बाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या ही बाब निदर्शनास आणून देऊन मुख्याधिकारी मुरूड यांना योग्य ते आदेश देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनाबाबत उत्तर देताना मंत्री तटकरे यांनी, याबाबत मुरूड नगर परिषदेचे मुख्याधिकारींना बोलावून घेण्यात येऊन योग्य ते निर्देश देण्यात येतील, असे सांगितले.

# कर्जत शहरातील गणेश घाटाची शिव मल्हार गटाकडून सफाई

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात अनंत चतुर्दशीनिमित्त गणपती बाप्पांचे विसर्जन झाले आहे. त्यावेळी गणेशभक्तांकडून विसर्जन सोहळ्यात काही निर्माल्य घाटावर पडले होते. ते सर्व निर्माल्य गोळा करून एकत्र करण्याचे काम कर्जत शहरातील शिव मल्हार गटाने हाती घेतले आणि अगदी सकाळी पूर्ण केले. या निमित्तने शिव मल्हार गटाच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले.

कर्जत शहरात नगर परिषदेच्या वतीने बांधण्यात आलेल्या गणेश घाटावर निर्माल्य कलश ठेवण्यात आले होते. शहरात महावीर पेठ येथे दोन तसेच शनी मंदिर, आमराई, प्रति पंढरपूर, दहिवली, मुद्रे, इंदिरानगर अशा ठिकाणी उल्हास नदीवर गणेश घाट आहेत. त्या सर्व गणेश घाटांवर बाप्पांचे विधिवत विसर्जन झाले होते.



मात्र सर्व गणेश घाटांवर बाप्पांवर केलेल्या पुष्पवृत्ती मधील फुले तसेच अन्य किरकोळ साहित्य ठिकाणी पडून राहिले होते. हे सर्व साहित्य उचलून घाट स्वच्छ करण्याची मोहीम कर्जत शहरातील शिव मल्हार गटाने आपल्या खांद्यावर घेतली.

या गटाकडून सकाळी साडे सात वाजल्यापासून सागर सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली दहिवली येथील ऐतिहासिक घाटावर स्वच्छता मोहीम घेण्यात आली. या स्वच्छता मोहिमेसाठी ओमकार कनोजे, लावण्या कनोजे, ईशांत मालुसरे, सार्थक गुरव, वेदांत सुपे, गौरव मूर्ती, यज्ञेश कनोजे, युगान सुर्वे,भव्य सुर्वे, तन्वी कनोजे, संकेत वरदाळे, नेत्रा कनोजे यांनी एकत्र येत गणेश घाट स्वच्छ करून गोळा झालेले निर्माल्य संकलित करून नगर परिषदेच्या गाडीपर्यंत नेवून दिले. या मोहिमेसाठी दिनेश कडू आणि राहुल गायकवाड यांनी झाडू आणि हातमोजे यांची मदत केली होती.

# झोपलेल्या मुलीचे चोरून फोटो काढणारा अटकेत

**खोपोली : प्रतिनिधी**

सोफ्यावर हाफ पँटवर एकांतात झोपलेल्या अल्पवयीन मुलीचे फोटो काढणाऱ्या नरेश यशवंत दळवी (वय ३०, रा.होराळे, वावोशी, ता.खालापूर) याला पिडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी अटक केली आहे.

सतरा वर्षे पिडीता दुपारी घरात सोफ्यावर झोपली होती. पिडितेच्या नकळत नरेश याने त्याचे मोबाईलमध्ये चोरून फोटो काढले. पिडीतेला याबाबत समजल्यावर तिने नरेश विरोधात खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. आरोपी नरेश दळवी विरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे. अधिक तपास सपोनि संतोष आवटी हे करीत आहेत. दरम्यान, या व्यक्तीवर कडक कारवाईची मागणी होत आहे.

# फुडमॉलजवळ बेशुद्ध सापडलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेसवर फुडमॉल नजीक बेशुद्ध अवस्थेत सापडलेल्या बावीस वर्षीय तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून तरुणाजवळ ओळखीचा कोणताही पुरावा सापडलेला नाही.

फुडमॉल नजीक सर्व्हिस रस्त्यावर तरूण जखमी अवस्थेत पडल्याची माहिती खालापूर पोलिसांना मिळाली होती.

पाच फूट सहा इंच उंचीचा, रंगाने सावळा, अंगात पांढरा शर्ट आणि काळी विजार असा पेहराव असलेल्या तरुण बेशुद्ध असल्याने तातडीने उपचारासाठी एमजीएम रुग्णालय कळंबोली येथे दाखल केले होते, परंतु त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तरुणाची बेवारस नोंद करण्यात आली असून खालापूर पोलीस नातेवाईकांचा शोध घेत आहेत.


**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

पनवेल महानगरपालिके मार्फत विविध प्रकारचे कार्यक्रम करण्यात येत असताना त्या अनुषंगाने सर्व कार्यक्रमांचे एकत्रित दर असावे या उद्देशाने विविध कार्यक्रम साजरे करण्या करिता वार्षिक मंजूर दर करणेकामी सदर निविदेचा तपशिल www.mahatender.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२५/
प्र.क्र. ४३९/४५०/२०२५
दिनांक :- ०८/०९/२०२५

सही/-
(गणेश शेटे)
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका



**सागर सम्राट सहकारी पतपेढी (मर्यादित) पनवेल**
नोंदणी क्र.: आर.जी.डी./पी.डब्ल्यु, एल/आर.एस.आर./ (सी.आर)/५०२/८७-८८ सन १९८८ ओ.एन.जी.सी. कॉलनी पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड

**३६ व्या वार्षिक सर्वसाधरण सभेची नोटीस**

**सागर सम्राट सहकारी पतपेढी (मर्यादित)**, पनवेल या संस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता हॉस्पिटल सभागृह, ओ.एन.जी.सी. कॉलनी फेज १, ता. पनवेल, जि. रायगड या ठिकाणी खालील कामकाजाचा विचार करण्याकरिता आयोजित केलेली आहे. तरी आपण वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती

*** सभेपुढील कामकाज ***

१. दिनांक २८/०९/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे वाचून मंजूर करणे.
२. दिनांक ३१/०३/२०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या कार्याचा संचालक मंडळाने तयार केलेला अहवाल ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रक यांस मंजुरी देणे.
३. सन २०२४-२०२५ च्या लेखा परिक्षण अहवालास मंजूरी देणे.
४. सन २०२५-२०२६ सालच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
५. सन २०२३-२०२४ या दोष दुरुस्ती अहवालास मंजूरी देणे.
६. सन २०२५-२०२६ या वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे
७. सन २०२५-२०२६ या वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे.
८. नफा विभागणीस मान्यात देवून सभासदांना लाभांष/भेटवस्तू जाहिर करणे.
९. मा. अध्यक्षाच्या परवानगीने येणारे इतर विषय.

पनवेल
दिनांक : ०६/०९/२०२५

सही/-
श्री. शंकर माया म्हात्रे
अध्यक्ष
सागर सम्राट सहकारी पतपेढी मर्या. पनवेल

*** विशेष सूचना :**
१) सभेला आवश्यक ती गणपूर्ति नसल्यास सभा अर्धा तास तहकूब करुन त्याच ठिकाणी त्याच विषयावर अर्ध्या तासानंतर सभा घेण्यात येईल अशा सभेला गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२) जर संस्थेच्या कामाविषयी कोणतीही सुचना विचारायची असल्यास सदर सुचना,अनुमोदकाच्या नावासहीत संस्थेच्या कार्यालयात सभेच्या ७दिवस आधी द्यावी.
३) सभासदांनी पत्ता अथवा वारस बदलाची नोंद संस्थेला लेखी/पत्राद्वारे कळवावी.
४) सभेनंतर सभासदांसाठी अल्पउपहार आयोजित केला आहे.


# स्व. वसंत ओसवाल यांच्या स्मृतिदिनानिमित्त कुलरचे लोकार्पण

**पाली : प्रतिनिधी**

लोकनेते तथा रायगड जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते स्व. वसंत ओसवाल यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त श्री क्षेत्र २१ गणपती येथे थंड पाण्याच्या कुलरची व्यवस्था करण्यात आली. सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा गीताताई पालरेचा यांच्यातर्फे देण्यात आलेल्या कुलरचे उदघाटन सुभाष ओसवाल व प्रकाश देसाई यांच्या हस्ते करण्यात आले.

या थंड पाण्याच्या कुलरचा लाभ सभोवतालच्या ११ गावातील नागरिकांना होणार असल्याने या विभागातील जनतेने या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक केले. या वेळी प्रकाश देसाई म्हणाले की, वसंत



ओसवाल एक बहुआयामी व्यक्तिमत्व व कणखर नेतृत्व होते. त्यांनी अल्पसंख्याक समाजातून येऊन देखील आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा रायगड सह महाराष्ट्रात प्रभावीपणे उमटविला. बहुजन समाजाच्या उन्नतीचा ध्यास घेऊन त्यांनी बहुजन समाजाला एकत्रित ठेवण्याचे काम केले.

गीता पालरेचा म्हणाल्या की, वडिलांनी दिलेला जनसेवेचा वसा व वारसा कायम पुढे नेण्याचा माझा दृढ संकल्प आहे. सुधागड तालुक्याचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी मी देखील प्रयत्नशील आहे. या वेळी उपस्थित विविध मान्यवरांनी वसंतराव ओसवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शब्दसुमनांची आदरांजली अर्पण केली.

या वेळी गीता पालरेचा, प्रकाश देसाई, वसंत ओसवाल यांचे बंधू सुभाष ओसवाल, मोहन ओसवाल, प्रकाश कारखानीस, ग.रा.म्हात्रे, हभप महेश पोंगडे महाराज, रमेश साळुंके, २१ गणपती ट्रस्टचे अध्यक्ष संजय शिंदे, दीपक पवार, योगेश सुरावकर, राजेंद्र गांधी, अजय खंडागळे तसेच ११ गावच्या मराठा समाज कमिटीचे सभासद, २१ गणपती मंदिर ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# तुपगावात ईद-ए-मिलाद उत्साहात

**चौक : प्रतिनिधी**

तुपगाव येथे ईद-ए-मिलाद ऊन नबी उत्साहात झाला. इस्लामिक कॅलेंडरनुसार रबी-उल-अव्वलच्या १२ व्या तारखेला साजरा होणाऱ्या ईद-ए-मिलाद उन नबीनिमित्त तुपगाव येथे उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. पैगंबर मोहम्मद साहेबांच्या जयंतीनिमित्त मुस्लिम बांधवांनी तुपगाव येथे भव्य रॅली काढली, ज्यामध्ये मोठ्या संख्येने



मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.

ही रॅली जामा मशीद येथून सुरू होऊन संपूर्ण तुपगांव मोहल्ला फिरून पुन्हा जामा मशीद येथे आल्यावर खीर वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. चौक प्रभारी विशाल पवार व त्यांचे सहकारी उपस्थित होते.


**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**
नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन - ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई-मेल: coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइट: kbmc.gov.in.

जा.क्र. : कुबनप/ई- गव्ह/२२८/२०२५-२६
दिनांक :- ०८/०९/२०२५

**निविदा जाहिरात**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे कामकाज हे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती, व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ तसेच राज्यशासन व केंद्र शासनाकडील विविध शासन निर्णय, आदेश यानुसार करण्यात येते. त्यानुसार कुबनपच्या PMAY योजने अंतर्गत मंजूर सदनिकांच्या सोडतीकरिता प्रचार प्रसिद्धी करणेकामी SMS gateway व ई-मेल गेटवे खरेदी करणेकरिता महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ०९/०९/२०२५ ते दि. १५/०९/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत दरपत्रक मागविण्यात येत आहे. तसेच सदरची निविदा दि.१६/०९/२०२५ रोजी दुपारी तीन वाजल्यानंतर अथवा प्रशासकीय सोईनुसार उघडण्यात येईल.

सही/-
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद,
कुळगांव


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - वावंजे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| सर्व्हे नं. गट नं. | हि.नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे भाव |
|---|---|---|---|---|
| १९ | ३/अ | ०-४५-२०<br>पो.ख. ०-१७-३०<br>एकूण ०-६२-५० | ७.९८ | श्री. अकलाख अब्दुल करीम शेख |

वरील एकूण क्षेत्र ० - ६२ - ५० हे. आर. पॉ. पैकी क्षेत्र ०.०८.०० हे.आर. पॉ., आकार ७.९८ रू. पैसे या मिळकतीची

दिनांक : ०९/०९/२०२५

सही/-
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स,
प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - वावंजे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| सर्व्हे नं. गट नं. | हि.नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे भाव |
|---|---|---|---|---|
| १९ | ४ | ०-२४-००<br>पो.ख. ०-०८-१०<br>एकूण ०-३२-१० | २.३१ | श्री. रामा मोतीराम जळे |

वरील एकूण क्षेत्र ०-३२-१० हे. आर. पॉ. पैकी श्री. रामा मोतीराम जळे यांचे हिश्याचे एकूण क्षेत्र ०.१६.०० हे. आर.पो., आकार १.८७ रू. पैसे या मिळकतीची

दिनांक : ०९/०९/२०२५

सही/-
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स,
प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - वावंजे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| सर्व्हे नं. गट नं. | हि.नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे भाव |
|---|---|---|---|---|
| १९ | ४ | ०-२४-००<br>पो.ख. ०-०८-१०<br>एकूण ०-३२-१० | २.३१ | श्री. शंकर पांडुरंग नांगरे |

वरील एकूण क्षेत्र ०-३२-१० हे. आर. पॉ. पैकी श्री. शंकर पांडुरंग नांगरे यांचे हिश्याचे क्षेत्र ०.०८.०० हे. आर. पॉ., पोट खराबा ०-०८-१० हे. आर. पॉ. एकूण क्षेत्र ०.१६.१० हे. आर. पॉ., आकार ०.९४ रू. पैसे या मिळकतीची

दिनांक : ०९/०९/२०२५

सही/-
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स,
प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

# नेरुळमध्ये वाहनतळाचे नियोजन कागदावरच!

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरुळमधील बहुतांश सोसायटीत वाहने उभी करण्यासाठी वाहनतळाची सोय नाही.त्यामुळे आपली खासगी वाहने रस्त्यावर सार्वजनिक रस्त्यावर उभी केली जात असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी मनपाने काही सेक्टरमध्ये वाहनतळ विषयी नियोजनदेखील केले होते, मात्र अद्यापही ते कागदावरच आहे. वाहनतळ उभारण्याची उपाय योजना केली नसल्यामुळे वाहनचालक त्रस्त आहेत.

सिडकोने तसेच खासगी विकासकांनी विकसित केलेल्या नेरूळ वसाहतीमधील काही सोसायट्या मध्ये पुरेशी वाहनतळाची सोय नसल्यामुळे शहरातील अंतर्गत सार्वजनिक रस्त्यावर सर्रास वाहने उभी केली जात आहेत. त्यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. सुरक्षित राहण्यायोग्य निवासी वसाहत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेरूळ वसाहतीत मनपाने वंडर पार्क, रॉक गार्डन, ज्वेल ऑफ नवी मुंबईसारखे प्रकल्प उभे केले आहेत. याशिवाय डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, तेरणा शैक्षणिक संकुल, एमजीएम मिशनची संकुल आहेत. मोठी दोन खासगी रुग्णालय तसेच नवी मुंबई मनपाचे माँसाहेब मीनाताई ठाकरे रुग्णालय आहे, परंतु नेरूळमध्ये अद्यापही सुरक्षित सार्वजनिक वाहन तळाची सोय करण्यात आली नाही. शहरातील विकासात ज्या प्रमाणे भर पडत आहे, त्या प्रमाणात लोकसंख्या आणि वाहनातही भर पडत असल्याने वाहनतळाअभावी नागरिक त्रस्त आहेत.



नेरूळमधील सेक्टर १९, २१, १७ तसेच सेक्टर १, ११, १५, ३ आणि ९ शिवाजी चौक ते स्टेशन रोड, फेज ३ मधील सेक्टर १६, १८, २४, ६, ४ तसेच नेरूळ फेज २ मधील सेक्टर ८, २ आणि १०, २० सिवूडसमधील सेक्टर ४६, ४८ परिसरातील सोसायटीत पुरेशी वाहने उभी करण्यासाठी जागा नसल्यामुळे बहुतांश वाहने रस्त्यावर उभी केली जात आहेत. त्यामुळे नियमित वाहतूक कोंडी होत असते. नेरूळमध्ये वाहनतळाची सोय नसल्यामुळे वाहन चोरी होणे, वाहनाचे पार्ट चोरीस जाण्याचे प्रकार वारंवार घडत असतात, शिवाय वाहन उभे करण्यावरून देखील वाहनचालकात वादंग होत असते.

नेरूळमध्ये एकूण ५८ सेक्टर आहेत, मात्र एकही वाहनतळ नसल्याने नेरूळ बाहेरून येणाऱ्या वाहनचालकांनी आपले वाहन कुठे उभे करायचे? असा प्रश्न पडतो. नेरूळ रेल्वे स्टेशन पूर्व आणि पश्चिम ठिकाणी पे अँड पार्क वाहन तळ असून ते अपुरे आहेत.

> **नेरूळ शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी छोटे-मोठे वाहनतळ उभारता येईल या विषयीचे नियोजन नवी मुंबई मनपा करित आहे.**
> **-भागवत डोईफोडे, उपायुक्त, मालमत्ता विभाग**

# दिवाळे कोळीवाड्यात गतिरोधक बसवण्याची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

'स्मार्ट व्हिलेज' योजनेंतर्गत दिवाळे कोळीवाड्यात गावाचे स्वरूप अत्याधुनिक आणि सर्व सुविधायुक्त बनले असले तरी गावातील मुख्य रस्त्यावर वाहनांच्या वेगामुळे नागरिक आणि विद्यार्थ्यांसाठी धोक्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर दिवाळे ग्रामस्थ मंडळाने नवी मुंबई महापालिकेच्या संबंधित विभागाला गतिरोधक बसवण्याची लेखी मागणी केली आहे.

दिवाळे कोळीवाडा मासळीसाठी प्रसिद्ध असून, गावात मासे खरेदीसाठी येणाऱ्या वाहनांची मोठी गर्दी असते. विशेषत: उत्साही ग्राहकांकडून वाहने अतिवेगात चालवली जात असल्याने अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. नागरिकांना गावातील मुख्य रस्त्यावरून ये-जा करताना वाहनांच्या वेगाचा सामना करावा लागतो, तर शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून रस्ता ओलांडताना आपला जीव धोक्यात घालावा लागतो. गाव दत्तक योजनेंतर्गत दिवाळे कोळीवाड्यातील रस्ते सिमेंट काँक्रीटचे झाले आहेत. यामुळे वाहने अधिक वेगाने धावतात. अशा परिस्थितीत ग्रामस्थांनी वेगमर्यादा पाळण्यासाठी आणि अपघात टाळण्यासाठी लवकरात लवकर गतिरोधक बसवण्याची मागणी केली आहे.

या मागणीत गतिरोधकाची योग्य रचना, रस्त्यावर स्पष्ट चिन्हे, वाहनांची गती मर्यादा व सुरक्षा उपायांचा समावेश करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून मागणी केल्यानंतरही नवी मुंबई महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम व वाहतूक परिवहन विभागाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. नागरिकांचा विश्वास आहे, की जर तत्काळ उपाययोजना केली नाही तर भीषण अपघात घडण्याची शक्यता आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

गावातील रस्त्यावर वाहनांची गर्दी आणि वेग लक्षात घेतल्यास नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या जीवाची सुरक्षा धोक्यात आली आहे. त्यामुळे मोठा अपघात होण्यापूर्वी प्रशासनाने गतिरोधक बसवून सुरक्षेची हमी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# मखर स्पर्धेत सुमित पाटील, प्रणाली म्हात्रे, करण पाटील विजयी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील कलाकारांच्या कलेला वाव देण्यासाठी बोरखार येथील सामाजिक युवा कार्यकर्ते तेजस डाकी यांनी आपल्या सामाजिक विकास मंडळातर्फे भव्य मखर सजावट स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेत १००हुन अधिक स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला होता. परिक्षकांनी केलेल्या परिक्षाणानंतर या स्पर्धेचा निकाल ७ सप्टेंबर रोजी बोरखार येथे जाहीर करण्यात आला. यात सुमित पाटील हे प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकाचे मानकरी ठरले.



त्यांना पंचवीस हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यांनी कालिका मातेचा सुंदर देखावा साकारला होता. सोबत शिव रूपातील गणेश मूर्ती आणि खाली शिव शंकराची पिंडी विराजमान करण्यात आली होती. त्यामुळे देखाव्याची शोभा आणखीन वाढली होती. तर प्रणाली म्हात्रे हिने हस्तकलेच्या माध्यमातून सर्वांना आकर्षित करणारी देखाव्याची कलाकृती साकारली होती. त्यांना द्वितीय क्रमांकाचे १५ हजाराचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले.

चिरनेर येथील करण कमळाकर पाटील यांना तृतीय क्रमांकाचे दहा हजाराचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले. त्यांनी कैलास पर्वताचा देखावा अगदी हुबेहूब साकारला होता. देखाव्यात शिवरूपी गणरायाची मूर्ती सोबत बाल गणेशाची मूर्ती भक्तांना भुरळ घालीत होती.

विजेत्यांना माजी सरपंच कैलास डाकी, तेजस डाकी व त्यांच्या मातोश्रींच्या हस्ते पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

# पनवेलमध्ये हत्तीरोग रुग्णशोध मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हत्तीरोग दूरीकरणसंबंधीची कार्यवाही प्रभावीपणे राबविण्यासाठी हत्तीरोग समस्या असलेल्या व नसलेल्या सर्वच जिल्ह्यामध्ये हत्तीरोग रुग्णशोध मोहिम राबविण्याबाबत शासनाच्या सूचना आल्या आहेत. त्यानूसार आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात मोहिम राबविण्यात येत आहे.



हत्तीरोग रूग्णशोध मोहिमेंतर्गत महापालिकेच्यावतीने ब्लॉक्सनूसार रात्र रक्त नमुने संकलन सर्वेक्षण करण्यात येत आहे. या अनुंषगाने पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत अतिजोखमीची ठिकाणे निश्चित करण्यात आली असून,येथील रात्र रक्त नमुने संकलन करण्यात येत आहेत. या अतिजोखीमीच्या भागांमधून हत्तीपाय रुग्णांची सर्वाधिक संख्या असलेले भाग निवडण्यात आले आहेत. तसेच झोपडपट्ट्यांचे प्रभाग, मोठ्या स्थलांतरित लोकसंख्येच्या वसाहती असलेली अशा क्षेत्राचीदेखील निवड करण्यात आल्याची माहिती मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ.आनंद गोसावी यांनी दिली आहे.

या मोहीमेंतर्गत हत्तीरोग रुग्ण शोधणे व कार्यक्षेत्रात संशयित रुग्णांचे रक्त नमुने गोळा करण्याचे काम व गोळा झालेल्या रक्त नमुन्यांची तपासणी करण्याचे काम महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत दिवसा हत्तीरोग रुग्ण शोधणे व रात्र रक्त नमुने संकलन एम एफ सर्वेक्षण बहुउद्देशीय कर्मचारी पुरुष व आरोग्य सेवकांकडून टीमद्वारे करण्यात येत आहे.

हत्तीरोग अर्थात लिम्फॅटिक फायलेरियासिस, लिम्फोएडेमा आणि हायड्रोसील यांचा फैलाव संसर्गित डासांद्वारे होतो. यामुळे कायमचे अपंगत्व येऊ शकते. यासाठी खालील उपाय योजना करावी.

घराच्या भोवताली असलेले खड्डे बुजविणे, जे खड्डे बुजविता येत नाहीत तेथील पाण्यात आठवडयातून एकदा खराब ऑईल/रॉकेल टाकणे. शौचालयाच्या व्हेंट पाईपला जाळी बसविणे. अंग पुर्णपणे झाकणारे कपडे घालावेत. झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा. आठवडयातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा. घराच्या छतावर व आजूबाजूला असलेले फुटके डबे, टायर्स, मडकी, नारळाच्या करवंट्या इ. ची विल्हेवाट लावावी. गावामध्ये किटकनाशक फवारणी पथक आल्यास संपुर्ण घरात फवारणी करून घ्यावी.

वरील सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यास किटकजन्य आजारांवर नियंत्रण ठेवणे शक्य होईल.

# कोपरखैरणे येथे 'अंनिस'तर्फे कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नवी मुंबई जिल्हा रबाळे व बेलापूर शाखेच्या वतीने रीजन्सी सोसायटी कोपरखैरणे येथे गणेश उत्सवानिमित्त चमत्कारामागील विज्ञान प्रयोगांचा सादरीकरण करण्यात आले.

यामध्ये सुरुवातीला सोसायटीचे सेक्रेटरी भूषण चिंचोळे यांनी सर्वांचं स्वागत व प्रास्ताविक केलं यानंतर नवी मुंबई जिल्हा प्रधान सचिव प्रा.अमोलकुमार वाघमारे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची पंचसूत्री व समितीच्या कार्याची माहिती उपस्थितांना करून दिली. यानंतर चमत्कार सादरीकरण प्रयोग ज्योती क्षीरसागर, महेंद्र राऊत, किरण वाळुंज, पवन कोकाटे व प्रा अमोलकुमार वाघमारे या अनिस कार्यकर्त्यांनी पाण्याने दिवा पेटवणे, मंत्राने अग्नी पेटवणे, नारळातून भूत भानामती करणे,प्रश्नचिन्ह ,अंगठ्यातून चेन पैसे काढणे असे अनेक विविध प्रयोग सादर केले. त्याचे प्रात्यक्षिक व माहिती उपस्थित सोसायटीतील लोकांना दिली त्याचबरोबर त्यांना असणाऱ्या शंकांचे निरसन केले.

शेवटी आभार पिसे सर यांनी मानले कार्यक्रमाला सोसायटीतील ६५ लोक लहान मुलांसह उपस्थित होते. असे प्रबोधन सातत्याने होणे हो काळाची गरज आहे. असे मत उपस्थित जेष्ठ नागरिकांनी व महिलांनी व्यक्त केले.

# जगभ्रमंतीवर निघालेल्या युवकाच्या दुचाकीची युकेमध्ये चोरी; शासनाकडे मदतीची हाक

**खारघर : प्रतिनिधी**

वसुदेव कुटुंबकम चा संदेश देण्यासाठी जगभ्रमंतीवर आपल्या दुचाकीने निघालेल्या नवी मुंबईमधील योगेश आळेकर यांची दुचाकी युके मधील नॉटिंगहॅममधून चोरीला गेल्याने आळेकर यांच्या प्रवासाला दुर्दैवी ब्रेक लागला आहे. योगेशने १ मे रोजी सुरू केलेल्या प्रवासा दरम्यान तब्बल १७ देश दुचाकीवर सर केले आहेत. या प्रवासादरम्यान योगेश अनेकवेळा जंगलातदेखील वास्तव्यास होते, मात्र नॉटिंगहॅमसारख्या शहरातुन दिवसाढवळ्या ही चोरी झाल्याने योगेश हातबल झाले आहेत.

भारत सरकारकडे योगेशने मदतीची हाक दिली आहे. चोरी झालेल्या गेलेल्या दुचाकी सोबत योगेश यांचा भारतीय पासपोर्ट, मॅक बुक, ३६० डिग्री कॅमेरा, कॅम्पिंगचे सामान, कपडे, रोख रक्कम, व्हिसा, महत्वाचे कार्ड, छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा आदी चोरीला गेले आहे. विशेष म्हणजे या घटनेतील तीन चोरटे दुचाकी चोरी करताना स्पष्टपणे कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. तरी देखील नॉटिंगहॅम पोलिसांना त्यांचा थांग पत्ता लावता आलेला नसल्याने योगेश प्रचंड तणावात आहे.



ऑलेंटन पार्क या नॉटिंगहॅम शहरातील पे अँड पार्कमधून ही दुचाकी चोरीला गेली आहे. योगेशने सोशल मीडियाद्वारे आपल्या देशवासीयांकडे मदतीची मागणी केली आहे. जगभ्रमंती करून आपल्या देशाचे नाव सातासमुद्रापार पोहचवणारा योगेश आळेकर अडचणीत आलेला आहे. ऑगस्ट महिन्यात २८ रोजी ही घटना घडून आठवडा उलटूनही अद्याप योगेशच्या दुचाकीचा शोध लागलेला नाही.

योगेशने नेपाळ, इराण, उझबेकिस्तान, कझाकिस्तान, चीन, रशिया, युरोप, जर्मनी, बेल्जीयम नॉर्वे यांसारख्या महत्वाच्या देशातून प्रवास केला आहे, मात्र युके सारख्या प्रगत देशात अशाप्रकारची चोरीची घटना घडल्याने आंतराष्ट्रीय पातळीवर पर्यटकांनादेखील एक धोक्याची घंटा आहे. तब्बल १८५०० किमीचा प्रवास योगेशने दुचाकीद्वारे पूर्ण केला आहे.

> **अतिशय दुर्दवी घटना माझ्यासोबत घडली आहे. युकेमधील नॉटिंगहॅम शहरातून माझी दुचाकी चोरटयांनी चोरली. याबाबत मी स्थानिक नॉटिंगहॅम पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे, मात्र अदयाप दुचाकींचा शोध लागला नाही. गाडीसोबत पासपोर्टसह रोख रक्कम, कॅमेरा, मॅकबुक व माझे सर्वच सामान चोरीला गेले आहे. याबाबत भारत सरकारने हस्तक्षेप करून मला न्याय मिळवून द्यावा.**
> **-योगेश आळेकरी**

# दिवाळे कोळीवाड्यातील वेताळेश्वर मंदिराचे भूमिपूजन

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

दिवाळे कोळीवाड्यातील श्री वेताळेश्वर मंदिर भूमिपूजन आणि दिवाळे गाव स्मशानभूमी व इतर विकसित कामाचा शुभारंभ जेष्ठ नागरिक कृष्णा कोळी यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आला. यासाठी सुमारे ३,४४,५२,४५१रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, दिवाळे कोळीवाड्यातील वेताळेश्वर मंदिर उभारणीमुळे गावातील धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवन अधिक समृद्ध होणार आहे. भावी काळात वेताळेश्वर मंदिर हे पंचक्रोशीतील सर्व भाविकांसाठी श्रद्धा, भक्ती, शक्ती आणि एकतेचा संगम असणार आहे. वेताळेश्वर मंदिर परिसरात भाविकांच्या मूलभूत विविध सर्व सोयी - सुविधा उपलब्ध होणार आहे.



या वेळी समाजसेविका अर्चना भोईर, वेतालेश्वर मंदिर अध्यक्ष सुरेश कोळी (बाये), कुमार कोळी, फगेवाले मच्छीमार संस्था अध्यक्ष अनंता बोस, डोलकर मच्छीमार संस्था अध्यक्ष तुकाराम कोळी, सोमनाथ देवकर, गंगेश कोळी, ज्ञानेश्वर कोळी, कैलास कोळी, दिवाळे गावाची मानाची पालखी अध्यक्ष करेश मुंबईकर, प्रेमसागर ब्रास बँड अध्यक्ष अशोक कोळी, फोर्ती+ क्रिकेट संघाचे प्रतिनिधी चंद्रकांत कोळी, संतोष कोळी, चंद्रकांत कोळी, बेलापूर मंडळ अध्यक्ष अजय सिंग, कल्पना शिंदे तसेच वेतालेश्वर मंदिर संस्थेचे पदाधिकारी व दिवाळे कोळीवाड्यातील ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी वेतालेश्वर मंदिर संस्था व त्यांचे सहकारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# गणेशोत्सव काळात तरुणाईने केली भजनसेवा

**खारघर : प्रतिनिधी**

गणेशोत्सव म्हटले कि भजन कीर्तन असा भावपूर्ण वातावरण सर्वत्र पहावयास मिळतो. या काळात भजनी मंडळ गावोगावी भजन करून भजनाची परंपरा कायम ठेवत असतात. यंदाच्या गणेशोत्सवाच्या काळात शेकडो भजने गावोगावी करून गावदेवी प्रासादिक भजन मंडळ पेंधर मधील तरुण भजनी मंडळाने एक वेगळा वारसा जोपासला आहे.



गावदेवी प्रसादिक भजन मंडळ पेंधर यांच्या या भजनसेवेसाठी पद्माकरबुवा पाटील यांचे शिष्य पंकज कोपरकर, पखवाजवादक ऋतिक पाटील, तबलावादक वंश म्हात्रे, अभिमन्यू तोडेकर यांच्या मार्फत ही भजन सेवा धार्मिक कार्यात केली जाते. शासनाने भजन मंडळांना सन्माननिधी देण्याचा उपक्रम यावर्षी राबविला आहे. या निर्णयाचे मोठ्या प्रमाणात स्वागत करण्यात येत असून डिजिटल युगात तरुणवर्ग भजनाकडे वळला आहे. त्यांनादेखील यामुळे प्रोत्साहन मिळणार आहे. संस्कृतीशी नाळ जोडलेल्या भजन सेवेद्वारे पंकज कोपरकर यांच्यासारखे असंख्य भजनी गायक भजनाचा प्रसार प्रचार करीत आहेत.

## स्लॅब कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ

**नवी मुंबई :** नेरूळ सेक्टर ४६, गुरुदत्त सोसायटीमध्ये रहिवासी पटेल फकीर शहा यांच्या बेडरूममध्ये स्लॅबचे प्लास्टर अचानक कोसळले. या घटनेत त्यांचा मुलगा जखमी झाला आहे.

शहा हे दुपारी झोपेत असताना हा अपघात घडला. स्लॅबचे प्लास्टर कोसळल्यामुळे संपूर्ण बेडरूम मातीने भरून गेले होते. घटनेनंतर शेजारचे घटनास्थळी धावले. भाजपचे आदित्य जाधव यांनी तातडीने भेट घेऊन पाहणी केली आणि सिडको व पालिकेने इमारतीची दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले. या घटनेमुळे सीवूड्स विभागातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. इमारतीतील स्लॅब व प्लास्टरच्या सुरक्षिततेवर त्वरित कारवाई करणे आवश्यक असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

# सत्याग्रह महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयात ५ सप्टेंबर, शिक्षक दिन ज्येष्ठ विचारवंत डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या वेळी राहुल शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व शाळा व महाविद्यालयांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमाला उपस्थित होते.

प्रारंभी, सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन आणि राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण केले. या वेळी प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, जागतिक दर्जाचे रोजगाराभिमुख शिक्षण देणे हेच शिक्षकाचे कार्य नसून, प्रज्ञा, करुणा आणि संविधानिक नीतिमत्ता असलेला नागरिक घडवणे ही खरी जबाबदारी आहे.

या वेळी प्राचार्या नेहा राणे, डॉ. प्रीती शर्मा यांनीही मार्गदर्शन पर भाषणे झाली.




# नवी मुंबईत पुनर्विकास परिषद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई परिसरात मोठ्या प्रमाणात पुनर्विकासाचे वारे वाहत आहे. सर्वच उपनगरांमधील अनेक रहिवासी सोसायट्यांच्या पुनर्विकासवर बैठका सुरू आहेत. अशात शहरात सातत्याने मार्गदर्शक कार्यक्रमांची मोठ्या प्रमाणावर रेलचेल पाहायला मिळत आहे. याच धर्तीवर विकास इंडिया ट्रस्ट, सहकार भारती व नवी मुंबई हौसिंग फेडरेशन तर्फे पुनर्विकास परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार (दि.१३) विष्णुदास भावे नाटयगृह, वाशी येथे सकाळी १० वाजता परिषद होणार आहे.

या वेळी वनमंत्री गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तसेच पुनर्विकास आणि स्वयं पुनर्विकास यावर रिजर्व बँक व नाबार्डचे संचालक सतीश मराठे, सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांचे मार्गदर्शन असणार आहे. विकास इंडिया ट्रस्टचे अध्यक्ष विकास पाटील, सहकार भारती अध्यक्ष प्रमोद जोशी, नवी मुंबई हौसिंग फेडरेशन अध्यक्ष सुनिल चौधरी, सचिव भास्कर म्हात्रे व सहकार भारती नवी मुंबई महामंत्री संतोष मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# हवामान बदलाने मासळीची आवक घटली

## मच्छीमार नौका किनारी



**मुरुड : प्रतिनिधी**

सध्या जोरदार वारा असल्याने मासळी खोल समुद्रात निघून गेली. त्यामुळे मासेमारी करण्यास जाणाऱ्या बोटींना मोठ्या प्रमाणात मासे मिळत नसल्याने माशांची आवक घटली आहे.

कोकणास ७२० किलोमीटर सागरी किनारा लाभलेला असून बहुसंख्य कोळी लोक समुद्रातून मासेमारी करून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. १ जून ते ३१ जुलै मासेमारीवर बंदी असल्याने सर्व बोटी किनाऱ्यावर होत्या, परंतु पावसाळी बंदी उठताच ऑगस्ट महिन्यात बोटी मासेमारीसाठी गेल्या होत्या. मध्यंतरी कालावधीवत चांगली मासेमारी झाली, मात्र अचानक हवामानात बद्दल झाल्याने जोरदार वारे व पाण्याचा प्रवाह वाढल्याने बोटी खोल समुद्रात हेलकावे खाऊ लागल्या आणि मग त्या किनाऱ्यावर आल्या.

सध्या मासळी मार्केटमध्ये ओले बोंबील व लहान कोलंबी मोठ्या प्रमाणत मिळत आहे, मात्र चविष्ट व मागणी असणारी मासळी ही मच्छी मार्केटमध्ये दिसत नाही. पापलेट, सुरमयी, रावस व हलवा या मासळीचे प्रमाण घटल्याने अशा मासळीचा तुटवडा निर्माण झाला आहे.

मासेमारी करणाऱ्या बोटी बहुतांशी मासे मिळाल्यावर मुंबई मार्केटमध्ये ती विकावयास जात आहेत.त्यामुळे स्थानिक ठिकाणी उपयुक्त मासे विकावयास मिळत नाही. स्थानिक बोट किनाऱ्यावर आल्यास लोकांना ताजी मासळी मिळत असते, परंतु तेही आता दुर्लभ झाले आहे.

खोल समुद्रात जाऊन आठ ते दहा दिवस राहूनसुद्धा मुबलक मासळी मिळत नसल्याने होणारा खर्च मच्छीमारांना परवडत नसल्याने बोटी आता किनारी येत आहेत.

याबाबत रायगड जिल्हा मच्छीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले की, हवामान बदलले असून खोल समुद्रात जोरदार वारे वाहत आहेत. त्यामुळे मासळी खोल समुद्रात निघून गेली. अशा वेळी मासेमारीसाठी जाळे टाकले तर ते गुरफटले जात आहे. खोल समुद्रात पाण्याची हालचाल मोठ्या प्रमाणात वाढली आहे.त्यामुळे बहुतांशी बोटी किनाऱ्यावर येत आहेत. ही परिस्थिती किमान १० ते १५ दिवस राहील असा कयास अनुभवी मच्छिमारांकडून बांधण्यात येत आहे. त्यामुळे पुढील काही दिवससुद्धा मासळीचा तुटवडा राहणार असल्याची माहिती या वेळी बैले यांनी दिली.

# भरपावसातही भक्तांचा उत्साह कायम

## पेणमध्ये दहा दिवसांच्या बाप्पांना निरोप

**पेण : प्रतिनिधी**

भाद्रपद शुद्ध चतुर्थीला मोठ्या भक्तीभावाने गणपती बाप्पांची प्राणप्रतिष्ठापना करून दहा दिवस बाप्पांची मनोभावे सेवा केल्यानंतर अनंत चतुर्दशीला शनिवारी गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, असे म्हणत गणेशभक्तांनी गणपती बाप्पांचे विसर्जन केले. विशेष म्हणजे आपल्या लाडक्या बाप्पाला भरपावसातही भक्तिमय वातावरणात मनोभावे निरोप देण्यात आला.



या वेळी नंदीमाळ नाका येथे भाजपतर्फे उभारण्यात आलेल्या स्वागत कक्षात माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, माजी नगरसेवक शहनाज मुजावर, प्रकाश रामणे भाजप शहर अध्यक्ष रवींद्र म्हात्रे, निशिगंधा गुंड, संजय पाटील, मितेश शहा, हितेश पाटील, पार्थ शहा आदींसह पदाधिकारी यांच्या वतीने गणरायांवर पुष्पवृष्टी करण्यात येत होती.

पेण तालुक्यात एकूण सहा सार्वजनिक व १४३५ घरगुती गणपतीचे मोठ्या जल्लोषात वाजतगाजत सवाद्य मिरवणुकांनी उत्साहात विसर्जन करण्यात आले. शहरातील वीज कर्मचारी मंडळ गणेशोत्सव, रिक्षा चालक-मालक संघटना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, न्यू स्टार मित्र मंडळ तरेआळी, ईगल ग्रुप मित्र मंडळ नंदीमाळ नाका व आंबेगाव येथील गणेशोत्सव मंडळ अशा पाच सार्वजनिक गणपतीचे तसेच तालुक्यातील घरगुती गणपतीचे सवाद्य मिरवणुकांनी वाजतगाजत विसर्जन करण्यात आले.

शहरातील गणपतींचे येथील भोगावती नदीच्या विसर्जन तटावर, तर ग्रामीण भागातील गणपतीचे त्या त्या गावातील नदीपात्रात व तलावात विसर्जन करण्यात आले. विसर्जन मिरवणुकांनी शहरातील रस्ते फुलून गेले होते.

या वेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात शांतता कमिटीच्या सदस्यांकडून व पोलीस प्रशासनाकडून तसेच गणेशविसर्जन घाटावर नगर परिषदेच्या वतीने गणेश भक्तांचे स्वागत करण्यात येत होते.

कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी ठिकठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे विसर्जन निर्विघ्न झाले.

# भाजप नेते अमित घाग यांचा नागरिकांशी संवाद, विकासकामांवर चर्चा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील किल्ला ते भालगाव जिल्हा परिषद भागात गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी गेल्या सहा दिवसांपासून भक्तिमय दौरा केला. त्यांच्यासोबत पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी त्यांनी नागरिकांशी विकासकामांवर चर्चा केली.

या दौऱ्यात तळाघर ग्रामपंचायत, वाशी, धाटाव, धामणसई, मेढा, वरसे, तांबडी, वाली, विरजोली, सवाने, किल्ला, घोसाळे व भालगाव या ग्रामपंचायतीतील गावांना भेट देऊन घाग व सहकाऱ्यांणी गणरायाचे दर्शन घेतले. भव्य मूर्ती, आकर्षक आरास आणि विविध सामाजिक उपक्रमांची पाहणी केली. पारंपरिक पद्धतीने सजवलेल्या मंडपात गजर, भजन व सांस्कृतिक कार्यक्रमामुळे सर्वत्र सणासुदीचे वातावरण अनुभवायला मिळाले.

या दर्शन दौऱ्यात गावकऱ्यांशी संवाद साधत स्थानिक प्रश्न, विकासकामे, शेतीविषयक अडचणी, रस्ते व पाणीपुरवठा अशा महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. या वेळी गणपतीनिमित्त गावी आलेल्या मुंबईकर चाकरमान्यांशीही घाग यांनी विशेष संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. मुंबईवरून आलेल्या चाकरमान्यांना सोयीस्कररीत्या घरी पोहचता यावे म्हणून रोहा रेल्वेस्थानक ते त्यांच्या गावापर्यंत वाहतुकीची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले.

गणराय हा एकतेचा आणि प्रगतीचा संदेश देतो. गावोगाव सण-उत्सवातून आपली संस्कृती टिकवली पाहिजे आणि त्याच वेळी सामाजिक व विकासकामांमध्येही सहभाग नोंदवला पाहिजे. प्रत्येक गाव प्रगतीकडे नेण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र काम करणे गरजेचे आहे, असे घाग यांनी या वेळी सांगितले.



# सिद्दी जफर शेखानी मेमोरिअल टेक्निकल इन्स्टिट्युटचा शंभर टक्के निकाल

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या अंजुमन इस्लाम जंजिरा सिद्दी जफर शेखानी मेमोरिअल टेक्निकल इन्स्टिट्युट मुरूड हे मागील ४७ वर्षापासून कोकणातील युवकांना तांत्रिक क्षेत्रात सक्षम बनविण्याचे काम यशस्वीरित्या करीत आहे. या टेक्निकल इन्स्टिट्युटचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५च्या वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. संस्थेत चालणाऱ्या चार ट्रेडमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली असून प्रत्येक ट्रेड मधील निकाल हा शंभर टक्के लागला आहे. सलग तीन वर्षापासून संस्थेचा निकाल १००% राहिला आहे.

अंजुमन इस्लाम जंजिरा सिद्दी जफर शेखानी मेमोरिअल टेक्निकल इन्स्टिट्युट मुरूडमध्ये शेहबाज शब्बीर मलबारी या विद्यार्थ्यास मेकॅनिकल मोटर गाडी या ट्रेडमध्ये ९५.५० टक्के गुण प्राप्त झाले आहेत. सन्नी संदेश पाटील याला इलेक्ट्रिशनमध्ये ९२.५० टक्के गुण प्राप्त झाले आहेत. कलीम इम्तियाज आदमने डिझेल मेकॅनिकमध्ये ९४.८३ टक्के, आय्यान असिफ खोत याला वेल्डरमध्ये ८४.३३ टक्के, प्रतिश दीपक पाटील याला मेकॅनिकल मोटरगाडी या ट्रेंडमध्ये ९१.८३ टक्के गुण प्राप्त झाले. कविराज किशोर बलकावडे याने इलेकट्रीशन प्रथम वर्षात ९१.५० टक्के गुण मिळवले आहेत. या टेक्निकल इन्स्टिट्युटमध्ये १३४ विद्यार्थी बसले होते व सर्व विद्यार्थी चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.

अंजुमन इस्लाम जंजिरा ही कोकणातील प्रसिद्ध शैक्षणिक संस्था आहे, ज्याच्या अंतर्गत प्राथमिक शाळा, माध्यमिक हायस्कूल , जुनिअर कॉलेज, महाविद्यालय आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालवली जात आहे.

संस्थेच्या प्राचार्य इश्तियाक अ. हमीद घलटे व टेक्निकल कमिटीचे चेअरमन समीर दौंनाक यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आणि प्रत्येक वर्षी असेच निकाल येतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# माणगावात उद्या नेत्र तपासणी शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन १० सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत माणगाव जुने एसटी स्टँडजवळल हॉलमध्ये करण्यात आले आहे.

दर महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या बुधवारी हे शिबिर होत असते. गेल्या दोन वर्षांत ३९ वेळा माणगावात शंकरा आय हॉस्पिटल आणि मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून नेत्ररुग्णांची तपासणी केली जाते. ज्यांना मोतीबिंदू आहे अशा नेत्ररुग्णांना पनवेल येथे आयोजकांच्याच गाडीत घेऊन जाऊन त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करून त्यांना पुन्हा माणगाव येथे आणले जाते. आतापर्यंत ३८००हुन अधिक मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या शिबिराला दरमहिन्याला नेत्ररुग्णांचा मोठा प्रतिसाद लाभतो.

# खोपोली पालिकेकडून गणेश मंडळांचे स्वागत

**खोपोली : प्रतिनिधी**

दहा दिवसानंतर आपल्या बाप्पाला निरोप देण्यासाठी मोठ्या प्रमाणात खोपोलीकरांनी विसर्जन घाटावर गर्दी केली होती. आपला लाडका बाप्पाला शेवटचा निरोप देताना भक्तांच्या डोळ्यांत अश्रू दाटले. पुढच्या वर्षी लवकर या अशी गर्जना करीत भक्तांनी गणरायाला निरोप दिला. खोपोली नगरपालिकेने दीपक चौकात स्वागत कक्ष उभारला होता. येणाऱ्या सर्व सार्वजनिक गणरायाचे या ठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात येत होते.

माजी नगराध्यक्ष तथा मराठा आंदोलनाचे राज्य समन्वय डॉ. सुनील पाटील, माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, माजी नगरसेवक किशोर पानसरे, उपमुख्याधिकारी पवार, भाजपचे युवा नेते विक्रम साबळे, माजी नगरसेविका केविना गायकवाड, भाजप शहराध्यक्ष




राहुल जाधव यांच्यरासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व अनेक मान्यवर या ठिकाणी उपस्थित होते.

गणेशभक्तांचा उत्साह भरभरून वाहत होता. ढोल ताशाचा गजर, गुलालाची उधळण त्यामुळे बाजारपेठेतील रस्ता लाल रंगात न्हाहून निघाला होता. स्वागत कक्षाजवळ मिरवणूक येताच उपस्थित व्यासपीठावरील नेत्यांनाही नाचण्याचा मोह आवरता आला नाही. यात सुनील पाटील कुलदीप शेंडे, विक्रम साबळे, किशोर पानसरे यांनी फेर धरला.

विसर्जन सोहळा पाहण्यासाठी परिसरातील खेड्यापाड्यातून नागरिक मोठ्या उत्साहात दाखल होत होते. वीरेश्वर तलाव येथे विसर्जन सोहळा संपन्न होत होता. या वेळी हेल्प फाउंडेशनचे कार्यकर्ते, त्याचप्रमाणे खोपोली पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पोलीस निरीक्षक सचिन हिरे जातीने सर्व सोहळ्यावर लक्ष ठेवून होते.

# डोंबिवली बँकेकडून शिक्षकांचा सत्कार

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या ५५व्या वर्धापन दिनाचे औचित साधत शनिवारी शिक्षकांचा सत्कार केला. शिक्षक हे विद्यार्थ्यांना ज्ञान देऊन नवी पिढी घडवत असतात. त्यामुळे त्यांचा हा सत्कार बँकेच्या वतीने करण्यात आला.



या कार्यक्रमाला वसंत देशमुख मेमोरियल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष उल्हासराव देशमुख, जनता विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक सरोदे, विकसक अतिक खोत, ज्येष्ठ पत्रकार जयवंत माडपे, भाजप महिला आघाडीच्या शहराध्यक्ष अश्विनी अत्रे यांच्यासह अनेक मान्यवर, ग्राहक व बँकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी बोलताना उल्हासराव देशमुख यांनी शिक्षक दिनाचे औचित्य साधत शिक्षकांचा सत्कार करून खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी जोपासली, असे सांगताना आजच्या युगात अनेक पतसंस्था उभ्या रहात आहेत, पण काही कारणास्तव त्या डबगईस येत आहेत, मात्र डोंबिवली बँकेने उत्तम सेवा, व विश्वासहर्ता याच्या जोरावर ५५ वर्षाचा टप्पा गाठला हे निश्चित गौरवास्पद बाब आहे, असे गौरवपूर्ण शब्दांत सांगितले.

बँकेच्या प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस उंचावत जावो, अशाही शेवटी देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या.

माजी मुख्याध्यापक सरोदे, विकसक अतिक खोत, पत्रकार माडपे यांनीही बँकेच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला तसेच शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. प्राथमिक स्वरूपात काही शिक्षकांनी बँकेने केलेल्या सत्काराबाबत कृतज्ञता व्यक्त केली.

प्रारंभी बँकेचे व्यवस्थापक स्वामी यांनी पाहुण्यांचे स्वागत केल्यानंतर प्रासविक भाषणात बँकेच्या आर्थिक उलाढालीबाबत थोडक्यात अहवाल सादर केला. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# भाविकांसह बाप्पांचे स्वागत

**माणगाव** : येथील काळनदी किनारी सार्वजनिक विसर्जन घाटावर भक्तगणांसह जल्लोषात आलेल्या सार्वजनिक व घरगुती बाप्पांचे नगरपंचायतीने श्रीफळ देऊन स्वागत केले. पोलीस प्रशासनकडूनही विसर्जनस्थळी चोख बंदोबस्त होता. घाटावर नगरपंचायत स्वच्छ सर्व्हेक्षण माझी वसुंधरा अभियान व पर्यावरणस्नेही गणेशोत्सव अंतर्गत भक्तांसाठी स्वागत कक्ष उभारण्यात आले होते. विसर्जनादिवशी मोकळ्या वातावरणात भक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला श्रध्दापूर्वक निरोप दिला.




**रोहा : रेल्वेस्थानक पोलीस चौकी येथे प्रतिष्ठापना केलेल्या गणरायाला अनंत चतुदर्शीच्या दिवशी निरोप देताना निरीक्षक पी.के. भाकर, सामाजिक कार्यकर्ते देविदास जाधव व अधिकारी, कर्मचारी.** (छाया : जितेंद्र जाधव)

# यूएस ओपनचा अल्काराझ बादशाह

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

यंदाच्या वर्षातील झंझावाती फॉर्म कायम राखत कार्लोस अल्काराझने युएस ओपन टेनिस स्पर्धेत यानिक सिनरला नमवत जेतेपदावर नाव कोरले. चुरशीच्या अंतिम लढतीत अल्काराझने सिनरवर ६-२, ३-६, ६-१, ६-४ असा विजय मिळवला. अल्काराझचे युएस ओपन स्पर्धेचे दुसरे, तर एकूण सहावे ग्रँड स्लॅम जेतेपद आहे. जेतेपदासह २२वर्षीय अल्काराझने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी झेप घेतली.



ग्रँड स्लॅम स्पर्धांमध्ये हार्डकोर्टवर सिनर २७ सामने जिंकला होता. सिनरचा दबदबा मोडून काढत अल्काराझने वर्चस्व सिद्ध केले. मी सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न केला मात्र ते पुरेसे नव्हते असे सिनरने सामन्यानंतर बोलताना सांगितले. अल्काराझविरुद्ध सिनरचा ग्रँड स्लॅम स्पर्धेच्या फायनलमध्ये झालेला दुसरा पराभव आहे. जून महिन्यात फ्रेंच ओपन स्पर्धेतही सिनरला पराभवाला सामोरे जावे लागले होते.

युएस ओपन स्पर्धेत गतविजेत्यांना जेतेपद राखता न येण्याची परंपरा यंदाही सुरूच राहिली. रॉजर फेडररने २००४ ते २००८मध्ये युएस ओपन स्पर्धेचे जेतेपद राखण्याची किमया केली होती, मात्र त्यानंतर कुठल्याही विजेत्याला जेतेपद राखता आलेले नाही.

दरम्यान, याआधी वर्ल्डची नंबर १ खेळाडू असलेल्या सबालेन्काने युएस ओपन स्पर्धेत ऐतिहासिक विजयाची नोंद केली. अंतिम सामना जिंकून तिने आपल्या युएस ओपन जेतेपदाचा यशस्वी बचाव केला. सबालेन्काने एनिसोवाचा ६-३, ७-६(३)ने पराभव केला. हे तिच्या टेनिस कारकिर्दीतील चौथे ग्रँडस्लॅम ठरले आहे.

या विजयासह तिने अनेक मोठे विक्रमही आपल्या नावे केले आहेत. ती ग्रँडस्लॅममधील पहिली अशी महिला खेळाडू आहे जी हार्ड कोर्टवर खेळताना चार ग्रँडस्लॅम जिंकू शकली आहे. या विक्रमात तिने किम क्लीस्टरची बरोबरी केली. ओसाकाने आपल्या कारकिर्दीत २०१८,२०२०, २०१९ आणि २०२१ ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेत जेतेपदाचा मान मिळवला होता. यासह तिच्या नावे आणखी एका मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. सबालेन्का ही केवळ दुसरी खेळाडू ठरली आहे, जी अंतिम सामना जिंकून ग्रँडस्लॅममध्ये खेळताना १०० सामने जिंकली आहे. याआधी दिग्गज खेळाडू सेरेना विल्यम्सने महिलांच्या एकेरी फेरीत सलग दोन वेळेस जेतेपद पटकावण्याचा पराक्रम केला होता. आता हा विक्रम सबालेन्काच्या नावावर नोंदवला गेला आहे.

## आशिया कपसाठी आजपासून चुरस

**दुबई : वृत्तसंस्था**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धा सुरू होण्यासाठी आता अवघे काही तास उरले आहेत. २०२५च्या आशिया कपचे सामने मंगळवार (दि. ९)पासून यूएईमध्ये खेळवले जाणार आहेत. दुबई इंटरनॅशनल स्टेडियमव्यतिरिक्त स्पर्धेचे सामने अबू धाबी येथील शेख झायेद स्टेडियममध्येदेखील होतील. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी भारतीय संघ यूएईमध्ये पोहचला असून संघाने सरावाला सुरुवात केली आहे.

आशिया कप स्पर्धेत १० सप्टेंबर रोजी भारताचा पहिला सामना होईल. गट अ मधील भारताचा पहिला सामना यूएईविरुद्ध होणार आहे. टीम इंडियाने यूएईमध्ये पोहचताच सराव सुरू केला. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील खेळाडू त्यात सहभागी झाले. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरही दिसला.

## रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या बॅडमिंटनपटूंचे 'सुवर्ण'यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे योगेश पाटील बॅडमिंटन अकादमीच्या मार्गदर्शनाखाली शटलर्सनी प्रशिक्षण घेत प्रतिष्ठित मालदिव ज्युनियर ओपन २०२५मध्ये पदके जिंकून आंतरराष्ट्रीय गौरव मिळवला आहे. यामध्ये सात देशांनी भाग घेतला होता.

'आरटीआयएससी'च्या मुकेश यादवर याने १९ वर्षांखालील मुलांच्या एकेरी आणि दुहेरीमध्ये सुवर्णपदक पटकाविले, तर तन्मय भगतने १९ वर्षांखालील मुलांच्या दुहेरीत सुवर्णपदके जिंकली. हे दोघे वायपीबीए प्रशिक्षक राजेंद्र घरत आणि अनिकेत बांदल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहेत.

**मालदिव ज्युनियर ओपनमध्ये जिंकली पदके**




याबद्दल बोलताना वायपीबीएचे योगेश पाटील यांनी सांगितले की, आरटीआयएससीसाठी हा अभिमानाचा क्षण आहे, कारण आमच्या खेळाडूंनी जागतिक स्तरावर त्यांची प्रतिभा आणि लढाऊ भावना प्रदर्शित केली आहे. तरुण शटलर्सना सक्षम करण्यासाठी सतत पाठिंबा दिल्याबद्दल रामशेठ ठाकूर आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलाचे मनापासून आभार!

## ...तेव्हा अजून वाईट वाटते -श्रेयस अय्यर

■ आशिया चषकात डावलल्याने व्यक्त केल्या भावना

**मुंबई : प्रतिनिधी**



आशिया चषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा झाल्यानंतर फलंदाज श्रेयस अय्यरला संधी न दिल्याने चर्चांना उधाण आले होते. भारताचा स्टार फलंदाज श्रेयसची वर्षभरातील कामगिरी पाहता त्याला आशिया चषकासाठी संघात संधी मिळेल अशी शक्यता होती, पण संघ जाहीर होताच अय्यरच्या नावाचा समावेश नव्हता. आता त्याने पहिल्यांदा याबाबत वक्तव्य केले आहे.

आशिया चषकाला ९ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. यापूर्वीच एका मुलाखतीत श्रेयस अय्यरने संघात निवड न झाल्याबद्दल वक्तव्य केले आहे. आयपीएलमध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या फलंदाजांपैकी एक असूनही मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीने त्याची निवड केली नाही.

श्रेयस अय्यरने आयक्यूओओ इंडिया पोडकास्टला दिलेल्या मुलाखतीत म्हणाला, जेव्हा आपल्याला ठाऊक असते की, आपण संघात, प्लेईंग इलेव्हनमध्ये स्थान मिळवण्यास पात्र आहोत आणि तरीही आपली निवड झालेली नसते, तेव्हा अजून वाईट वाटते, पण त्याचवेळी जेव्हा कळतं की, एखादा खेळाडू सातत्याने संघासाठी चांगली कामगिरी करत आहे आणि संघासाठी आपले सर्वोत्तम देतो आहे, तेव्हा त्याला पाठिंबा दिला जातो. शेवटी उद्दिष्ट एकच असते, संघाचा विजय. संघ जिंकतो तेव्हा प्रत्येकजण आनंदी असतो.

पुढे अय्यर म्हणाला, भले आपल्याला संधी मिळाली नाही, पण प्रामाणिकपणे कामगिरी करत राहणे आवश्यक आहे. कोणी पाहत नसतानाही आपण आपले काम करत राहायला हवे. अय्यरला आशिया चषकात संधी डावलल्यानंतर त्यासा ऑस्ट्रेलिया अ संघाविरूद्ध होणाऱ्या बहुदिवसीय सामन्यांसाठी भारतीय अ संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.

## सिकंदरने टाकले विराटला मागे

**हरारे : वृत्तसंस्था**

झिम्बाब्वेचा अष्टपैलू खेळाडू सिकंदर रझाने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सामनावीर पुरस्कारांच्या बाबतीत विराट कोहलीला मागे टाकत एक नवीन विक्रम केला. रझाने हा पराक्रम हरारे येथे श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात केला.

रझाने उत्कृष्ट कामगिरीत चार षटकांत ११ धावा देत तीन बळी घेतले आणि यामुळे झिम्बाब्वेने पाच गडी राखून सहज विजय संपादन केला. ३९ वर्षीय रझाचा हा टी-२० सामन्यांमधील १७ वा सामनावीर पुरस्कार आहे. यामुळे तो पूर्ण-सदस्य देशांमधील खेळाडूंमध्ये अव्वल स्थानावर पोहचला. एकूण टी-२० क्रमवारीत मलेशियाचा वीरदीप सिंग १०२ सामन्यांमध्ये २२ सामनावीर पुरस्कारांसह सर्वोच्च आहे.

## इंग्लंडचा द. आफ्रिकेवर विश्वविक्रमी विजय

**साउथहँप्टन : वृत्तसंस्था**

मालिका गमावलेल्या इंग्लंडने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या वनडेत ३४२ धावांच्या प्रचंड फरकाने विजय मिळवला. वनडे क्रिकेटमधला हा धावांच्या फरकाने सर्वोत्तम विजय आहे. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना ४१४ धावांचा डोंगर उभारला होता. प्रत्युत्तरादाखल खेळताना दक्षिण आफ्रिकेचा डाव ७२ धावांतच आटोपला.

इंग्लंडला बेन डकेट आणि जेमी स्मिथ यांनी ५९ धावांची खणखणीत सलामी करून दिली. ३१ धावा करुन डकेट परतला. यानंतर स्मिथला जो रूटची साथ मिळाली. ६२ धावांवर केशव महाराजने स्मिथला बाद केले. यानंतर रूटने जेकब बेथेलला हाताशी घेत तिसऱ्या विकेटसाठी १४४ चेंडूत १८२ धावांची मॅरेथॉन भागीदारी केली. या भागीदारीदरम्यान बेथेलने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधले पहिलेवहिले शतक झळकावले. १३ चौकार आणि तीन षटकारांसह ११० धावांची खेळी करून बेथेल बाद झाला. रूटने यानंतर सूत्रे हाती घेत १९वे वनडे शतक पूर्ण केले, मात्र शतकानंतर लगेचच तो तंबूत परतला. त्याने सहा चौकारांसह १०० धावांची खेळी केली.




मोठ्या धावसंख्येसाठी पाया रचून मिळालेला असताना अनुभवी जोस बटलरने ३२ चेंडूत आट चौकार आणि एका षटकारासह नाबाद ६२ धावांची वेगवान खेळी केली. कर्णधार हॅरी ब्रूक मात्र भोपळाही फोडू शकला नाही. विल जॅक्सने आठ चेंडूत १९ धावा करत बटलरला चांगली साथ दिली. दोन शतके आणि बटलरच्या फटकेबाजीमुळे इंग्लंडने चारशे धावांची वेस ओलांडली. दक्षिण आफ्रिकेतर्फे कॉबिन बॉश आणि केशव महाराज यांनी प्रत्येकी दोन विकेट्स पटकावल्या.

प्रत्युत्तरादाखल खेळताना दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी सपशेल शरणागती पत्करली. जोफ्रा आर्चरच्या भेदक गोलंदाजीसमोर एडन मारक्रम, रायन रिकलटन, मॅथ्यू ब्रिजट्स, ट्रिस्टन स्टब्ज हे प्रमुख फलंदाज निष्प्रभ ठरले. आर्चरला आदिल रशीद आणि ब्रायडन कार्स यांनी तोलामोलाची साथ दिली. रशीदने तीन, तर कार्सने दोन विकेट्स घेतल्या. दक्षिण आफ्रिकेचा डाव २१ षटकात ७२ धावांतच आटोपला आणि इंग्लंडने विश्वविक्रमी विजयाची नोंद केली.

## पूरग्रस्तांसाठी हरभजन सिंग सरसावला!



**चंदिगड : वृत्तसंस्था**

भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंग याने पंजाबमधील पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. हरभजनने मदतकार्यासाठी बोटी आणि रुग्णवाहिका पुरवल्या आहेत आणि निधी उभारून त्यांनी पूरग्रस्तांना मदत केली आहे.

हरभजनने ११ स्टीमर बोटी दिल्या आहेत. प्रत्येक बोटीची किंमत सुमारे ४.५० ते ५.५० लाख रुपये आहे. याशिवाय हरभजनने गंभीर रुग्णांना जवळच्या रुग्णालयात नेण्यासाठी तीन रुग्णवाहिकादेखील खरेदी केल्या आहेत.

हरभजनने त्याच्या मित्रमंडळी आणि ओळखीच्या लोकांकडूनही मदत मागितली. त्याच्या आवाहनावर एका क्रीडा संघटनेने ३० लाख रुपये दिले आहेत, तर त्यांच्या दोन जवळच्या मित्रांनी अनुक्रमे १२ लाख आणि सहा लाख रुपये दिले आहेत. बाधित कुटुंबांना मदत करण्यासाठी भज्जीने सुमारे ५० लाख रुपये जमा केले आहेत. या रकमेतून लोकांना अविरत अन्नधान्य आणि औषधे पोहोचवली जात आहेत.

## रेडलँड्सच्या विजयात लाबुशेन चमकला

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा स्टार फलंदाज मार्नस लाबुशेन याने केएफसी टी-२० लीगमध्ये फलंदाजीसह गोलंदाजीतही दमदार कामगिरी केली आहे. आधी क्वीन्सलँड संघाविरुद्ध खेळताना त्याने दमदार शतक झळकावले होते. आता व्हॅलीज संघाविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यात त्याने हॅट्ट्रिक घेत संघाला विजय मिळवून दिला.

लाबुशेन आपल्या फलंदाजीसाठी ओळखला जातो. दरम्यान संघाला गरज असताना तो गोलंदाजीदेखील करताना दिसतो. केएफसी टी-२० लीगमध्ये रेडलँड्स संघाकडून खेळताना लाबूशेनने अष्टपैलू कामगिरी केली. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये



तुम्ही पाहू शकता की, उजव्या हाताचा लेग स्पिनर लाबुशेन एकापाठोपाठ एक तीन फलंदाजांना बाद करून माघारी धाडत आहे.

या सामन्यात क्वीन्सलँड संघाकडून प्रथम फलंदाजी करताना रेडलँड्स संघाने २० षटकांअखेर सहा गडी बाद १९१ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या व्हॅलीज संघाचा डाव १५० धावांवर आटोपला. यासह हा सामना रेडलँड्सने ४१ धावांनी आपल्या नावावर केला.

या सामन्यात १९२ धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या व्हॅलीज संघाला १५व्या षटकात मार्नस लाबुशेनने मोठे धक्के दिले. या षटकातील शेवटच्या चेंडूवर मार्नस लाबुशेनने टी मॉरिसला बाद करत पहिली विकेट मिळवली. मॉरिस १३ चेंडूत १७ धावा करत माघारी परतला. त्याला लाबुशेनने यष्टिरक्षकाच्या हातून झेलबाद करत माघारी धाडले.

यानंतर १८व्या षटकातील पाहिल्याच चेंडूवर मार्नस लाबुशेनन याने सी बॉयसला बाद करत माघारी धाडले. तो आठ चेंडूत सात धावा करत माघारी परतला. त्यानंतर रॉयसदेखील दिलेल्या धावांचा पाठलाग करू शकला नाही. तो लाबुशेननच्या गोलंदाजीवर बाद होऊन माघारी परतला. त्याला बाद करण्यासाठी खेळाडूने सीमारेषेवर भन्नाट झेल टिपला गेला. यासह त्याने आपली टी-२० कारकिर्दीतील पहिलीच हॅट्ट्रिक घेतली.

## 'त्या' गोलंदाजाच्या ॲक्शनला हिरवा कंदील

**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसीने दक्षिण आफ्रिकेचा फिरकीपटू प्रिनेलन सुब्रायनची गोलंदाजी शैली निर्दोष असल्याचा निर्वाळा दिला असून यामुळे तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आता गोलंदाजी करू शकेल. आयसीसीने एका पत्रकाद्वारे ही घोषणा केली.

यापूर्वी सुब्रायनची गोलंदाजी शैली संशयास्पद असल्याचा अहवाल १९ ऑगस्ट रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्या वनडे सामन्यानंतर देण्यात आला होता. या अहवालानंतर २६ ऑगस्ट रोजी ब्रिस्बेन येथील एनसीएमध्ये त्याच्या गोलंदाजीची स्वतंत्र तपासणी करण्यात आली. या तपासणीत असे आढळले की, त्याच्या सर्व चेंडूंमधील कोपर




वळवण्याचा कोन आयसीसीच्या नियमांनुसार असलेल्या १५ अंशांच्या मर्यादेत होता.

३१ वर्षीय सुब्रायनने २०२५मध्ये आतापर्यंत फक्त दोन आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. दोन्ही सामने याच वर्षी पदार्पण केलेले आहेत. सुब्रायनने झिम्बाब्वेत कसोटी आणि ऑस्ट्रेलियात वनडे सामना खेळला. त्याच्या गोलंदाजीवर तेथेच आक्षेप घेण्यात आला होता. या दोन सामन्यांमध्ये सुब्रायनने पाच आंतरराष्ट्रीय बळी घेतले आहेत.

## संजू सॅमसनसंदर्भात रवी शास्त्रींचे मोठे वक्तव्य

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारतीय संघातील विकेटकिपर बॅटर संजू सॅमसन हा टी-२० क्रिकेटमध्ये सातत्याने दमदार कामगिरी करताना दिसतोय. आशिया कप स्पर्धेसाठी त्याची टीम इंडियात निवडही झालीये, पण तो प्लेइंग इलेव्हनमध्ये असेल का यासंदर्भातील चित्र अद्याप अस्पष्ट आहे. उपकर्णधारच्या रुपात शुबमन गिल पुन्हा संघात परतल्यामुळे संजूला सलामीला संधी मिळणे मुश्किल वाटते. या संदर्भात आता टीम इंडियाचे माजी कोच आणि विद्यमान समालोचक रवी शास्त्री यांनी मोठे वक्तव्य केले आहे. आशिया कप स्पर्धेआधी त्यांनी कोच गौतम गंभीर आणि सूर्यकुमारला एक मोलाचा सल्ला दिला आहे.

टी-२० वर्ल्डकपनंतर संजू सॅमसन हा भारतीय संघातून सलामीवीराच्या रुपात खेळताना दिसत आहे. बांगलादेश, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत सलामीवीराच्या रुपात १२ सामन्यांत त्याने १८३.७० स्ट्राइक रेटसह ४१७ धावा कुटल्या आहेत. इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील कामगिरी सोडली तर त्याने खास छाप सोडलीये. जर शुबमन गिलला सलामीवीराच्या रूपात पहिली पसंती देण्यात आली, तर संजू सॅमसनचे प्लेइंग इलेव्हनमधील स्थानही धोक्यात येईल, कारण लोअर मिडल ऑर्डरमध्ये जितेश शर्मासोबत त्याची टक्कर असेल.

एका बाजूला संजूसंदर्भात मोठा पेच निर्माण झाल्याचे दिसत असताना रवी शास्त्री यांनी सलामीवीराच्या रूपात त्यालाच पसंती दिलीये. संजू हा आघाडीच्या फलंदाजीतील खतरनाक फलंदाज आहे. त्यामुळे त्याच्या बॅटिंग ऑर्डरमध्ये कोणताही बदल न करता त्याला सलामीलाच खेळवायला हवे. हे टीम इंडियाचे हिताचे ठरेल, असे मत रवी शास्त्रींनी व्यक्त केले आहे. शुबमन गिलला संघात घ्यायचे असेल, तर त्याला दुसऱ्या कुणाच्या तरी जागेवर खेळवा, असा सल्ला शास्त्रींनी टीम इंडियाला दिला आहे.

आयपीएलच्या यंदाच्या हंगामात दुखापतीमुळे संजू सॅमसन बऱ्याच सामन्यांना मुकला, पण आशिया कप स्पर्धेआधी त्याने केरळा क्रिकेट लीगमध्ये धमाकेदार कामगिरी करून दाखवलीये. एका शतकासह सातत्यपूर्ण अर्धशतकी खेळीचा डाव खेळत त्याने आशिया कप स्पर्धेतील दावेदारी भक्कम केलीये. शास्त्रींनी त्याच्याकडून बॅटिंग केल्यावर टीम इंडियाचा कोच गंभीर ते गांभीर्याने घेणार का? सूर्याही संजूच्या पाठिशी ठाम उभा राहणार का? ते पाहण्याजोगे असेल.

## रांचीच्या रस्त्यावर धोनीने चालवली आलिशान कार



**रांची : वृत्तसंस्था**

महेंद्रसिंह धोनी हा केवळ क्रिकेटच्या मैदानावरच नाही, तर मैदानाबाहेरही लाखो लोकांच्या गळ्यातचा ताईत आहे. धोनीला बाईक्स आणि कार खूप आवडतात हे कोणापासूनही लपलेले नाही. त्याच्या गॅरेजमध्ये अनेक विंटेज कार आणि सुपरबाईक पार्क केलेल्या असतात. धोनी अनेकदा रांचीच्या रस्त्यांवर वेगवेगळ्या प्रकारच्या वाहनांतून आणि बाईकवरून प्रवास करताना दिसतो. यावेळी तो त्याच्या क्लासिक रोल्स-रॉइससह रांचीच्या रस्त्यावर फेरफटका मारताना दिसला.

सध्या धोनीचा नवीन व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. त्यामध्ये एक तरुण चाहता त्याच्या कारच्या मागे धावत असल्याचे दिसून येते आणि जवळचे लोक हा क्षण त्यांच्या मोबाईलमध्ये कैद करताना दिसतात. हा व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे.

धोनीच्या ऑटोमोबाईल कलेक्शनबद्दल बोलायचे झाले, तर २०२३मध्ये वेंकटेश प्रसादने धोनीच्या गॅरेजची एक झलक शेअर केली होती. रिपोर्ट्सनुसार त्याच्याकडे ७०हून अधिक मोटारसायकली आणि सुमारे १५ लक्झरी, विंटेज कार आहेत. यामध्ये कावासाकी निन्जा, डुकाटी, हार्ले डेव्हिडसन आणि अनेक प्रीमियम कार समाविष्ट आहेत.

## भारतीय हॉकी संघाचे अभिनंदन

**नवी दिल्ली :** आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय संघाने कोरियाचा ४-१ अशा फरकाने पराभव करत तब्बल आठ वर्षांनंतर प्रथमच या स्पर्धेच्या जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. भारताचे या विजयामुळे २०२६च्या विश्वचषकातील स्थानही निश्चित झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदींसह इतर मान्यवरांनी संघाचे अभिनंदन केले.

लापता



नाम: महेन्द्र प्रसाद सहाय
उम्र - 72 वर्ष ,
रंग - गोरा,
उचाई - 5'2"
सम्पर्क करें: जितेन्द्र कुमार झा, फ्लॅट - 102, पद्मा प्रिया सोसाइटी, प्लॉट-27, से-11, न्यू पनवेल (E)
M-8081426435,9892967051
सूचना देने वाले को उचित इनाम दिया जायेगा

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com